# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६२**


MAHMAR/19356/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ११ / ऑक्टोबर २००२



## संपादकीय

## 'इजा, बिजा आणि तिजा'

कै. वसंत बापट आणि कै. शिवाजी सावंत यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मजकूर लिहिला आणि प्रुफ सांगुर्डेकरांकडे पाठवली. त्याच संध्याकाळी प्रिया तेंडुलकर गेल्याची बातमी ऐकली व 'इजा बिजा तिजा' होऊ नये असं वाटत असतानाच असं झालं !

मृत्यू अटळ आहे. पण अकाली मृत्यू झाला तर शद्ब मुके होऊन, मनातल्या मनात गुडघ्यात मान घालून स्फुंदत रहातात. सर्वसामान्य माणसाचा मृत्यू आणि लेखक कलावंताचा मृत्यू यात फार अंतर असतं. कलावंतांच्या कर्तृत्वामुळे सामान्यांच्या जीवनाला अर्थ आलेला असतो. एखादी प्रचंड मोठी शिळ अंगावर कोसळावी तसा मृत्यू आपल्यावर कोसळत असतो. त्याच्या दाबाखाली आपण सुन्न होतो. जीवन प्रवासातील अखेरचे स्थळ, अपरिहार्य स्थळ, आपला ही प्रवास त्याच दिशेने सुरू असतो, तरी देखील त्याच्या अशा अकाली जाण्याच्या बातम्या आल्या की माणूस अगतिक होतो.

प्रिया तेंडुलकरांच्या बातमीनं असेच सुन्न केले. 'रजनी' ची त्यांची प्रतिमा जनमानसावर कोरलेली आहे. तरीही त्यांचं लेखन हे अधिक लक्षात राहणारं, नितळ, समोर बसून संवाद केल्यासारखं होतं. त्यांच्या जीवन शैलीतील प्राधान्य क्रमांमुळे असेल कदाचित, त्या मानाने त्यांनी कमी लिहिले. पण जे लिहिले ते अनुभवाचे. बारावीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील 'मॉडेलिंग आणि मी' हा त्यांचा पाठ वानगी दाखल वाचून पहावा किंवा पंचतारांकित मधील कोणताही लेख वाचून पहावा ..... त्यांचे समाज शास्त्रीय भान अतिशय वेगळे आहे हे लक्षात येते !

अकाली जाणाऱ्या किती तरी जणांच्या मृत्यूने असेच वेळो वेळी उदास केले आहे. काशिनाथ घाणेकर, मीना कुमारी, भक्ती बर्वे, स्मिता पाटिल.... आणि आता प्रिया तेंडुलकर ! मृत्यूची कारणं काहीही असतील पण ज्यांच्या अस्तित्वाला अर्थ होता अशी ही नावं आहेत. प्रिया तेंडुलकरांना श्रद्धांजली वाहताना मनात प्रार्थना आहे, ''हे परमेश्वरा, असं अकाली कोणालाच नेऊ नकोस, अगदी रेल्वे अपघातात किंवा बेधुंद गोळीबारात ही ! कारण त्यांच्या असण्यात कोणाचं तरी असलेपण सामावलेलं असतं !''

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक ११ / ऑक्टोबर २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महर्षी व्यास | श्री. शं. वा. मठ | ३ |
| २) | 'श्रेणी' विषय-एक शोकांतिका | श्री. प्र. द. अरटकर | ८ |
| ३) | ऋत | श्री. डॉ. मो. गो. धडफळे | १२ |
| ५) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ७ वा) ॥ ज्ञानविज्ञानयोगः ॥ | श्रीमती आशा भिडे | १४ |
| ६) | भारतातील पाच आचार्य व त्यांचे तत्वज्ञान | डॉ. सौ. गीता कुलकर्णी | २१ |
| ७) | मोडी लिपीच्या संदर्भात | सौ. दीपाली हिंदोळकर | २४ |
| ८) | शिक्षक दिनानिमित्ताने | सौ. कालिंदी कोल्हटकर | २७ |
| ९) | पुस्तक परिचय | सौ. भारती जोशी | २९ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३३ |

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ११
५४१ ३५ ४६

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महर्षी व्यास

*व्यासांच्या प्रतिभेने स्पर्श केला नाही असा एकही विषय जगात नाही. या वंदनीय व्यास ऋषींवरील हा माहितीपूर्ण लेख. - संपादक*

जयो नाम इतिहासोऽयं श्रोतव्यो विजिगीषुणा।
महीं विजयते राजा शत्रूंश्चपि पराजयेत ॥

महाभारताचे वर्णन करताना हा जय नावाचा इतिहास आहे असे म्हटले आहे. हा इतिहास विजिगिषु वृत्तीच्या जनांनी ऐकावा. तसेच या इतिहासाच्या श्रवणाने राजा पृथ्वी जिंकून राज्य करतो व शत्रूंची दाणादाण करून टाकतो. महाभारतात जय संज्ञा ही फार महत्त्वाची आहे. या संबंधी भविष्य पुराणातील पुढील श्लोकावरून हे ध्यानात येईल.

**अष्टादश पुराणानि। रामस्य चरितं तथा।**
**कार्ष्यं वेदं पंचमंच। यत् महाभारतं विदु:**
**तथैव विष्णु धर्मांश। शिवं धर्मांश शाश्वता:**
**जयेति नाम तेषां। प्रवदन्ति मनीषिण:।(भविष्य पुराणे)**

**अनुवाद**-अठरा पुराणे, श्री रामचरित, पाचवा वेद महाभारत तसेच वैष्णव उपासना शैव उपासना ज्या चिरंतन तत्वाकडे नेणाऱ्या आहेत त्या सर्वांनाच बुद्धिमान माणसे जय नावांनी ओळखतात.

महाभारताचे कथन नैमिषारण्यामध्ये केले जात असे. ज्या अरण्यात भगवंताने एका निमिषात दैत्यांचा संहार केला त्या अरण्याला नैमिषारण्य असे म्हणण्यात येते. पूर्वी मोठाले आश्रम होते. तेथे विद्यार्थी शिक्षण घेत असत. तेथे कुलपति असत. त्या संबंधी असे वर्णन आढळते की-

**मुनीनां दश साहस्त्रं योन्नदानादि पोषणात्।**
**अध्यापयति विप्रर्षि: असौ कुलपति:स्मृत:।**

ज्या आश्रमात दहा हजार मुनींना खाण्यापिण्यापासूनची सोय निर्माण केली जात असे व त्यांचे शिक्षणही योग्य प्रकारे करून घेण्यात येत असे अशा आश्रम प्रमुखाला 'कुलपति' असे म्हटले जात असे.

महभारताची सुरुवात अशी करण्यात आली आहे. एकदा नैमिषारण्यात शौनक नामक कुलपतीने द्वादश वार्षिक सत्र (यज्ञ) आरंभिले. त्यावेळी सूतपुत्र उग्रश्रवा तेथे आला. त्याला तिथे काही कथा सांगाव्यात असे वाटले. म्हणून त्या सूतपुत्रास (सौतीस) कथा सांगण्यास मुनीने सांगितले. सौती म्हणाला मुनि श्रेष्ठ हो महाराज परीक्षिताचा पुत्र जनमेजय यांनी आरंभिलेल्या सर्प सत्राला मी गेलो होतो. तेथे त्यांना वैशंपायनांनी व्यास प्रणीत महाभारतातील कथा निवेदन केल्या. त्या ऐकून पर्यटन करीत मी इथे आलो. ऋषि त्याला म्हणाले - जी कथा व्यासांनी रचली, देवादिकांनी ऐकता क्षणीच वाहवा केली ती कथा आम्हाला सांगावी.

सौतीने महाभारताचे महत्त्व सांगण्यास सुरुवात केली. या इतिहास ग्रंथाचे महत्त्व फारच आहे. ही कथा पूर्वी, आता व पुढेही सांगितली जाईल यात जगताची उत्पत्ती, देव सृष्टी,भूत सृष्टी, चुतर्विध पुरुषार्थ, तत् प्रतिपादक श्रुती स्मृति, व शास्त्रे इत्यादी अनेक विषयांचे उल्लेख विवेचन केले आहे. हा सर्व उपक्रम व उपसंहार श्री भगवान बादरायणाला योग बलाने प्राप्त झाला. दृढ समाधीच्या अनुष्ठाने त्याच्या हृदयात संपूर्ण इतिहास व सकल सृष्टी प्रगट झाली. हे भारतात्मक ज्ञानकांड श्री व्यासांनी संक्षिप्त व विस्तृत अशा दोन्ही रूपांनी निरूपण केले.

### व्यासाना ब्रह्मदेवाचे दर्शन

व्यासांनी उग्र तपश्चर्या व कडकडीत ब्रह्मचर्य याच्या योगे समाधि योग सिद्ध केल्यावर सनातन वेदाचे विभाग केले. त्यातील तत्वाचे विवेचन करता करता या परम पावन इतिहासाची अंतर्यामी सुव्यवस्थित रचना केली. या ग्रंथाचे सर्वतोमुखी अभ्यास चालून यातील सिद्धांतांचे पठण सदा सर्वकाळ होईल तरच या ग्रंथाचे साफल्य झाले असे समजले पाहिजे. अशी त्याना तळमळ लागली. ही तळमळ ब्रह्मदेवाच्या ध्यानात आली. ब्रह्मदेव प्रगट झाले. त्याला व्यास म्हणाले - भगवन् मी अत्यंत श्रेष्ठ असे काव्य रचिले आहे. त्यात अनेक विचारांचे प्रतिपादन आहे. वेदाचे रहस्य, त्यातील विस्तार, उपनिषदे, इतिहास, पुराणे, काळाची स्थिती, जरा मृत्यू, भय, व्याधि,अस्तित्व अभाव यांचा निश्चय, धर्माधर्म विचार, आश्रमाची लक्षणे, चातुर्वर्ण्य, तपश्चर्या, ब्रह्मचर्य, यांचे विवेचन, कथा निर्देश, पृथ्वी व युगे, चंद्र, ग्रह, नक्षत्रे, यांचे प्रमाण, वेदमयी, ब्रह्मज्ञान, न्याय, शिक्षा, चिकित्सा, दान, पाशुपत महात्म्य, मानुष जन्म, पुण्यतीर्थे, पवित्र देश, नद्या पर्वते, वने, समुद्र, लोकाचार, नीतिशास्त्र, सर्वव्यापक परब्रह्म, या काव्यात प्रतिपादले आहे. या काव्याचा लोकात प्रसार व्हावा त्या द्वारे काव्य रचनेचा हेतू सिद्धीस जावा, या स्तव चतुर लेखक कोण मिळेल म्हणून मी चिंतन करीत आहे. असा लेखक मला पृथ्वीवर आढळत नाही.

हे ऐकून ब्रह्मदेव म्हणाला- तुझी वाणी सत्य व वेद यास अनुसरून आहे. हे पराशर पुत्रा हे तुझे काव्य लिहिण्यास विद्याधिपति गणपतीच योग्य आहे. तू त्याचे स्मरण कर. तो प्रगट होऊन तुझी चिंता दूर करील.

### व्यास गणपती संवाद

व्यासानी गण नायकाचे स्मरण केले. तो प्रगट झाला. त्याचे यथोचित स्वागत करून व्यास म्हणाले - हे विघ्नेशा मी भारत ग्रंथाची रचना केली असून तो मी स्वतः सांगत आहे. तर तू त्याचा लेखक हो (मम त्वं लेखको भव।) गणपती म्हणाला- व्यास तुझे म्हणणे मला मान्य आहे. माझी अशी एक अट आहे. मी लिहीत असताना माझी लेखणी क्षणभरही थांबणार नाही असे तू कबूल करीत असल्यास मी लेखक होईन. त्यावर व्यास म्हणाले-तुझी अट मी मान्य करतो. परंतु तू जे काही लिहिशील त्याचा अर्थ मनात आणून तू ते लिहीत जा. म्हणजे माझी काहीच हरकत नाही. अशा प्रकारे उभयतांनी अटी मान्य केल्यावर भारत ग्रंथ व्यासांनी कथन केला आणि गणेशानी तो लिहिला.

### भारताची संख्या

महाभारत मूळचे एक लक्ष आहे. त्यामध्ये भारत संहिता चोवीस हजार आहे. राहिलेल्या शाहत्तर हजार श्लोकात सच्छिल पुरुषांच्या मनोवेधक कथा आहेत. हा अवाढव्य पसारा पाहून बादरायणाने १५० श्लोक रचिले व त्यात भारत ग्रंथाची सर्वपर्वे, वृत्तांत संकलित रूपाने सांगितला. याला अनुक्रमणिका ध्यान असे म्हणतात. हा ग्रंथ द्वैपायनाला आपला पुत्र शुक यास सांगितला व नंतर अनेक सत्पात्र शिष्याना सांगितला. व्यासांनी एकूण ६० लक्ष संहिता रचिली. ३० लक्ष संहिता देवलोकी प्रसिद्ध आहे. देवलोकी नारदांनी निरूपण केले, पितृलोकी असित देवल यांनी, गंधर्व लोकी शुक्राचार्यांनी आणि मानुष लोकात वैशंपायन ऋषीने निरुपण केले. ते व्यासाचे मुख्य शिष्य होते. (आदिपर्व)

### व्यास यांचा जन्म

भगवान व्यास हे पराशर व सत्यवती यांचे पुत्र होते. व्यासांच्या जन्मानंतर- सत्यवतीचा विवाह शंतनुशी झाला. शंतनुला गंगेपासून भीष्म हा पुत्र होता. शंतनु व सत्यवती याना चित्रानंद व विचित्रवीर्य अशी दोन मुले झाली. चित्रानंद गंधर्वाच्या हातून युद्धात मरण पावला. विचित्रवीर्य गादीवर बसला. भीष्माने अंबिका व अंबालिका

या दोन वधूशी त्याचा विवाह केला. संतति न होताच त्याचे अकाली निधन झाले. गादीला वारस नाही हे पाहून सत्यवती भीष्माला आपली कथा सांगते. माझ्या वडिलांची एक नौका होती. लहानपणी मी तिथे एकदा गेले. त्याच दिवशी अत्यंत श्रेष्ठ असा श्री पराशर महर्षि यमुना नदी तरून जाण्याच्या इच्छेने त्या तरीवर चढला. तरी चालत असता हा ऋषि मजकडे आला आणि शांतपणे माझ्याशी काम प्रेरित गोड गोड बोलू लागला. मी त्याना म्हटले मी नावाड्याची मुलगी आहे. तरी पण त्यांच्या शापाची भीती वाटू लागली तसेच माझ्या वडिलांची पण भीती वाटू लागली. तेव्हा त्या ऋषीने दुर्मिळ असे वर देऊन माझे मन प्रलोभित केले. मला नाही म्हणवेना. माझे पोरवय. मला समजत नव्हते. त्या ऋषीने आपल्या तेजाने मला दिपवून टाकले आणि स्व प्रभावाने सर्वत्र अंधार उत्पन्न करून नौकेतच मला वश केले. माझ्या अंगाला माशांची घाण येत असे. ती नाहीशी करून अंग सुगंधि केले. माझे ठिकाणी गर्भ धारण केली. तू प्रसूत झाल्यावर पुनःकन्यात्वच पावशील. या नदीच्या द्वीपावर (बेटावर) माझा मुलगा ठेव. हा मुलगा पुढील काळात मान्यता पावेल. असे सांगून महायोगी पराशर निघून गेले. हा मुलगा मला कन्या अवस्थेत झाला. हाच महायोगी पाराशर्य. (कृष्ण द्वैपायन).

यानेच आपल्या तपः प्रभावाच्या योगाने वेदाचे चार भाग केले. म्हणून त्याला व्यास ही संज्ञा प्राप्त झाली. तो काळा होता म्हणून कृष्ण व बेटावर जन्मला म्हणून द्वैपायन. कृष्णद्वैपायन हाच माझा मुलगा व्यास होय. हा सत्यवादी, शांत, तपस्वी व निष्पाप आहे हा आपल्या वडिलांकडेच निघून गेला. संकटकाळी माझे स्मरण कर व मी उपस्थित होईन असे जाताना तो मला सांगून गेला. भीष्मा तुझी परवानगी असल्यास मी त्याला बोलावीन व तो विचित्रवीर्य याच्या क्षेत्रात पुत्र निर्माण करील. (म. भा. आदि पर्व अध्याय १०५)

सत्यवतीच्या स्मरणाने व्यास उपस्थित झाले तिच्या विनंतीवरून अंबिका व अंबालिका या दोघींच्या ठिकाणी पुत्र निर्माण केले व तसेच अंबिकेच्या दासीच्या ठिकाणी एक पुत्र निर्माण केला पुनः तपश्चर्येसाठी बदरिकाश्रमी निघून गेले. पुत्रांची नावे धृतराष्ट्र, पंडु व विदुर अशी होती.

**व्यास कथित द्रौपदी पूर्व वृत्तांत** (आदिपर्व अ. १६९)

एक चक्रा नगरीत व्यास पांडवांना भेटले व त्याना खालील गोष्ट कथन केली. पूर्वी एका तपोवनात एका माहात्म्य ऋषीची एक कन्या होती. ती लावण्यवती असून सर्व गुणांनी युक्त होती. मात्र ती भाग्यहीन होती. रूप संपन्न असूनही तिला पती मिळेना. ती दुःखी होऊन पति प्राप्तीसाठी तिने तप केले. उग्र तपाच्या योगाने भगवान शंकर संतुष्ट झाले. तिला म्हणाले- हे कल्याणी मी प्रसन्न झालो आहे. काय पाहिजे तो वर मागून घे. मला सर्वगुण संपन्न पति मिळावा असे ती अनेक वेळा म्हणाली. शंकर म्हणाले- हे भद्रे तुझ्या मागणी प्रमाणे भरत वंशोत्पन्न पाच पुरुष तुझे पती होतील. ती म्हणाली - आपल्या कृपेने मला एकच पती मिळावा. शंकर म्हणाले तू पती दे असे पाच वेळा म्हणालीस त्यावरून तुझी इच्छा पाच पति मिळावेत अशी आहे असे मी समजलो व त्याप्रमाणे मी तुला ते देऊ केले. तुला जन्मान्तरी पाच पती प्राप्त होतील.

ही कन्या आता द्रुपद कुळात उत्पन्न झाली असून ती तुमची पत्नी होणार असा ईश्वरी संकेत आहे. या करता तुम्ही द्रुपदाच्या नगरात जाऊन रहा. ती तुम्हाला प्राप्त होईल यात शंका नाही. पांडव तेथे गेले. द्रौपदी स्वयंवरात भाग घेतला. पण जिंकून द्रौपदी प्राप्त केली.

**व्यासांचा आपल्या मातेस उपदेश** (आदिपर्व अ. १२८)

माते काळ मोठा कठीण आला आहे. सर्व सुख मागे राहील. यापुढे दुर्धर प्रसंग एकापेक्षा एक मोठे येणार

आहेत. कपट माजून धर्म बुडणार, अनीती वाढणार, या कुरु वंशाच्या पुरुषांच्या हातून अन्याय व जुलूम होऊन जगात आतंक माजेल. तू योग मार्गाचा अवलंब करून- अरण्यात जाऊन रहा. तुझ्या कुळाचा भयंकर संहार तू पाहू नकोस. भीष्माचा निरोप घेऊन दोन्ही सुनासह सत्यवती अरण्यात गेली.

### व्यास-व्यक्तिमत्त्व

व्यास अलौकिक व्यक्तिमत्वाचे महापुरुष, ग्रंथकार, महाज्ञानी, होऊन गेले. व्यासांना भगवान व्यास म्हणण्याची विद्वानात परिपाठी आहे. श्रीमत् शंकराचार्य त्यांच्या भगवान व्यास या नावानेच उल्लेख करतात. व्यास हे ज्ञान गंगेचे भगीरथ आहेत. ज्ञानरूपी हिमालयाच्या शिखरावर वाहणारी दिव्य ज्ञान गंगा व्यासांनी भूतलावर आणली. म्हणूनच व्यासोच्छिष्टं जगत् सर्वत्। जगतील सर्वज्ञान व्यासांनी उष्टे करून सोडले आहे अशी लोकोक्ती रूढ झाली आहे. युगा-युगातून एखाद्याच वेळी अशी विभूती जन्माला येते. व्यासांचा जन्म भारतात झाली ही गोष्ट भारतीय जनतेला अनंत काळ पर्यंत एक अभिमानाची गोष्ट राहील. आजवर जगात असा थोर विद्वान आणि साहित्यकार झाला नाही. पुढे केव्हा होईल सांगता येत नाही. वेदोत्तर काळापासून तो आजतागायत व्यास हे भारतीय संस्कृतीचे महाप्राण ठरले आहेत. आपली संस्कृती व्यासकृत महाभारत व पुराणे यावर आधारलेली आहे. इतिहास पुराणांची रचना, प्राचीन- युगातील विस्मृत प्राय अशा विद्या कलांचे पुनरुज्जीवन, वेदवेदांगाचे संकलन-संपादन आणि विभाजन या भागीरथ तुल्य प्रचंड उद्योगाने व्यासाने भारतीय संस्कृती अक्षुण्ण राहिली. इतिहासातले हे एक महदाश्चर्य म्हणावे लागेल.

अखिल भारतात एकात्मता निर्माण करावी. तसेच वेदातील व लोकवाङ्मयातील मूल्ये परिष्कृत करून त्याद्वारे विश्व प्रेमाची प्रतिष्ठा साधावी हाच व्यासांच्या- अंतरंगातला दिव्योदात्त आशय होता. त्या दृष्टीने प्रेम, मैत्री, उद्योग, मानवतेचा गौरव, सामाजिक व राष्ट्रीय सौहार्द, नीती शिक्षण इत्यादी गोष्टींचा उपदेश व्यासानी केला आहे. या खंडप्राय देशातील आर्य, अनार्य, वेदवादी, वेदविन्मुख, गृहस्थी, संन्यासी ज्ञान, भक्ती व कर्म, शैव-वैष्णव, निर्गुण आणि सगुण यांच्यातले अंतर्द्वंद्व समाप्त होऊन भारताच्या राष्ट्रीय जीवनात सद्‌भाव सुहृत् भाव, नैतिक आणि आध्यात्मिक उत्कर्ष प्रस्थापित व्हावा या महनीय उद्देशाने व्यास प्रेरित झाले होते. व्यास हे व्यक्तिमत्त्व नसून ती उपाधी आहे. ते धार्मिक पीठ आहे.

### व्यास व राष्ट्रीय अभ्युत्थान

अज्ञात अतीता पासून वर्तमानापर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत एक प्रचंड देशाकाल व्यासांच्या दृष्टीपुढे उभा होता. या राष्ट्राचे अभ्युत्थान घडावे एतदर्थ ते बद्ध परिकर झाले होते. राष्ट्र सुखी संपन्न आणि सर्वांगी परिवर्धित व्हायचे तर आधी राज्यातली राजनीती सुरक्षित राहिली पाहिजे. राजा नीतिमान, चारित्र्यवान, समर्थ आणि नित्य सावधान असला पाहिजे. जर राजा समर्थ नसेल तर दुष्ट दुर्जन सज्जनाना खाऊन टाकतील आणि धर्माची नौका बुडून जाईल. राष्ट्राचा म्हणून एक सामान्य धर्म असतो आणि तो शासनाच्या दक्षतेवर आणि सुव्यवस्थेवर आधारलेला असतो. म्हणून व्यासांनी राजसत्तेचे विस्तृत व सुयोग्य मार्ग दर्शन केले आहे. सर्व धर्म हे राजधर्मांच्या आधीन असतात. हे व्यासांना पूर्णपणे उमगले होते म्हणून ते राजधर्माचे विवरण करताना म्हणतात - जो लोक रंजन करतो, अर्थात प्रजेला सुखी ठेवतो तो राजा. जो लोकांना संकटाच्या खाईतून बचावतो तो क्षत्रिय. राजा जेव्हा योग्य प्रकारे दंडनीतिचे पालन करतो तेव्हा तो काळ घडवू शकतो. वेळी भूमीवर सत्ययुग अवतरते. राजाने माळी व्हावे. कोळसे बनविणारा होवू नये. माळी फुलाफळासाठी वृक्षांची जोपासना करतो. त्याप्रमाणे राजाने प्रजेला समृद्धीचा मार्ग दाखवून तिच्याकडून त्या समृद्धीतला एक चतुर्थांश कर

ग्रहण करावा. कोळशांचा व्यापारी सगळा वृक्षच मुळासकट उच्छेदून त्याला जाळून टाकतो, त्या प्रमाणे राजाने प्रजेला ओरबाडून घेऊ नये. एक राजधर्म बिघडला की वेद, धर्म, अर्थ, आश्रम, त्याग, तप, विद्या, सगळे काही रसातळाला गेले असे समजावे. (म.भा.शान्ति पर्व अ.६३)

### व्यास आणि धर्म

व्यासांनी धर्माचे जे विवेचन केले आहे ते त्यांचे महान ऋषीत्व किंवा दर्शन आहे. देशकाल परिस्थितीत व्यक्ती, राष्ट्र, समग्रजीवन, लोक, आणि परलोक या सर्वांचे जो धर्मांची धारण व पोषण करतो तो धर्म होय, अशी त्यांनी धर्माची व्याख्या केली आहे. लोकस्थितीचे सनातन बीज म्हणजे धर्म होय. धर्म म्हणजे केवळ स्वर्ग मोक्षाचा विचार नव्हे. तर या व्यावहारिक जगात लोक धारणा करतो, लोकांना सुखी समृद्ध, परस्पर पूरक नीती प्रवण आणि पुरुषार्थी बनवतो तो धर्म होय. जर धर्मनिद इहलोकी माणसाचे कल्याण करायला हवे. हे परलोकीच्या कल्याणहूनही श्रेष्ठ होय. जर धर्म जीवनाचे धारण करणारी उत्तम वस्तू असेल तर जीवन तितकेच मूल्यवान असायला हवे. व्यासांच्या मते जीवन रडण्या-कुढण्याचे नसून ते आनंदमय आहे. माया समजून त्याचा त्याग करता कामा नये. व्यास इहलोकीचा कर्मवाद मानतात त्या बरोबरच दैव वादही मानतात. आणि अध्यात्म किंवा आत्मतत्व यावरही विश्वास ठेवतात. व्यास दर्शनाचा केंद्रबिंदु देव नसून मनुष्य आहे हे स्पष्टपणे सांगतात. गुहां ब्रह्म तदिदं ब्रवीमि। न हि मानुषात् श्रेयतरं हि किंचित्। (म.भा. शान्ति अध्यात्म १८७-१२) म्हणूनच त्यानी माणसाला पुरुषार्थाचा उपदेश केला आहे. पाणि म्हणजे हात, म्हणजेच पुरुषार्थ. पुरुषाचा उद्यम. व्यासांची पुरुषार्थावर विलक्षण श्रद्धा होती. सर्वत्वाने त्यांनी इंद्राच्या मुखाने पाणि वादाची प्रशंसा केली आहे.

अहो सिद्धार्थता तेषां येषां सन्तीह पाणय:। अतीव स्पृहये तेषां येषां सन्तीह पाणय:। पाणिमद्भ्य: स्पृहाऽस्माकं यथा तव धनस्यवै। न पाणि लाभात् अधिको लाभ: काचत विद्यते। (म. भा. शान्ति अ. १८० श्लोक ११ व १२) ज्याना हात आहेत ते काम करू शकतात. ज्याना हात आहेत ते सिद्धार्थ होत. ज्याना हात आहेत ते मला अतिशय आवडतात जशी धनाची आकांक्षा तशीच मला हाताची. पाणि लाभाहून दुसरा लाभ कोणताही वरचढ नाही. (इथे हात, पुरुषार्थ या अर्थी घेतलेला आहे.)

### व्यासाचा मननीय दृष्टिकोन :

या संसारात जेवढे म्हणून प्रयत्न आहेत, जेवढ्या म्हणून योजना आहेत त्या सर्वांचा मध्य बिंदू मानव आहे. सर्व काही तेव्हाच खरे,ते जेव्हा मानवाना हितकारी ठरेल. मानवी जीवनात ज्ञान आणि कर्म यांचा समन्वय आहे. त्या जीवनाची पूर्तता होण्यासाठी आध्यात्मिक साधना आणि सिद्धि जितकी आवश्यक आहे तितकीच लौकिक समृद्धीही आवश्यक आहे. मानवी ऐहिक जीवनाचे आधार स्तंभ दोन. एक अर्थशास्त्र व दुसरा राजशास्त्र किंवा दंडनीती. अर्थावाचून जगात पान हालत नाही. हा मानवी अर्थ राजधर्माश्रित आहे म्हणून राजाने योग्य प्रकारे नीतीला अनुसरून शासन चालवावे आणि माणसाने उद्यमशील राहावे. जो अर्थलाभ करून घ्यावयाचा तो स्वाभिमान जागृत ठेवून साधावा. अप्रतिष्ठेच्या मार्गाने माणसाने कोणत्याही वस्तूची आकांक्षा धरू नये. भीक मागण्याचा मार्ग किंवा लुटारूपणाचा मार्ग अप्रशस्त होय. मग त्यात केवढाही अर्थलाभ अभिप्रेत असो. श्रमार्जित लाभ हेच तत्त्व माणसाने सर्वत्र डोळ्यापुढे ठेवावे.

### विषादग्रस्त व्यास

महाभारत लिहिताना व्यासांना युद्धे, कपट, कारस्थाने, अनेक अक्षौहिणींचा संहार त्यातून पसरलेला विषण्ण उद्वेग याचे वर्णन करावे लागले. त्यामुळे त्यांच्या मनाला विषादाने ग्रासले. त्यांना चैन पडेना. अशा स्थितीत एके दिवशी नारदमुनी भेटले.

(पान क्र. ४० पहा)

# 'श्रेणी' विषय - एक शोकांतिका

*शालेय अभ्यासक्रमात काही विषय का असतात, ते नसतील तर काय होईल, त्यांचे महत्त्व काय असते.... अशा अनेक मुद्यांचा आपण कधी विचारच करीत नाही. अशा विषयांचा मागोवा या लेखात घेतला आहे. - संपादक*

एस्. एस्. सी. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर कुठल्याही विद्यार्थ्यांचे गुणपत्रक त्याचे पालक, शिक्षक, शेजारी, मित्र मंडळी आवर्जून उत्सुकतेने पाहतात. त्यामध्ये त्याची टक्केवारी आणि मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र ह्या सहा प्रमुख विषयांमध्ये त्याने मिळविलेले गुण पाहिले जातात. पण त्याच बरोबर त्या गुणपत्रिकेमध्ये कार्यानुभव, मूल्यशिक्षण, सामान्यज्ञान, शारीरिक शिक्षण, स्काऊट-गाईड, समाजसेवा इ. शालेय श्रेणी विषयांमध्ये त्याने संपादन केलेली श्रेणीही दर्शविलेली असते. पण त्याकडे कुणाचेही सहसा चुकूनही लक्ष जात नाही, असे का होते ? कारण बऱ्याच जणांना एस्. एस्. सी. परीक्षेला हे विषय देखील असतात याचीच माहिती नसते. शिवाय या विषयांचा उल्लेख सांकेतिक क्रमांकाने केलेला असतो. ते सांकेतिक क्रमांक कुठल्या विषयाचे आहेत, हे पहाण्याचे कष्ट पहाणारी व्यक्ती सहसा घेत नाही. ज्यांना हे विषय माहीत असतात. ते देखील या विषयातील विद्यार्थ्याने मिळविलेली श्रेणी विचारात घेत नाहीत. कारण त्यांच्या लेखी या विषयांचे इतर विषयांच्या तुलनेने काहीच महत्त्व नसते असे का व्हावे ? या विषयांमध्ये कुठलीही शाळा कोणत्याही विद्यार्थ्याला सहसा अनुत्तीर्ण करत नाही आणि चुकून एखाद्या शाळेने एखाद्या विद्यार्थ्याला अनुत्तीर्ण केल्यास त्या विषयामध्ये शाळेने त्या विद्यार्थ्याला उत्तीर्ण करावे, असा आग्रह एस्. एस्. सी. बोर्ड धरते. यातून या श्रेणी विषयांचे दुय्यमत्व, त्यांच्याबद्दलची अनास्था, त्यांचे दुर्लक्षितपण, उपेक्षितपण दिसत नाही का ? मग या विषयांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्याचे प्रयोजनच काय ? एस्. एस्. सी. ला या विषयांची शालेय स्तरावर परीक्षा घेतली जाते आणि मुलांना या विषयांमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. यातून कोणते उद्दिष्ट साध्य होते ?

### १) कार्यानुभव

कोठारी आयोगाच्या शिफारशीप्रमाणे १९७५ मध्ये नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे घेण्यात आलेल्या एस्. एस्. सी. परीक्षेला या विषयाचा अंतर्भाव करण्यात आला. श्रमांचे मूल्य विद्यार्थ्यांना कळावे, त्यांचा पोषाखीपणा कमी व्हावा, त्यांच्यामध्ये श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी वगैरे उद्दिष्टये या विषयाचा समावेश करताना नजरे समोर ठेवण्यात आलेली होती. +२ स्तरावर विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळावेत आणि पुढे त्यांना उपजीविकेसाठी स्वतःचा स्वतंत्र उद्योग, व्यवसाय करता यावा या दृष्टीने पायाभरणी केली जावी, म्हणून माध्यमिक स्तरावर हा विषय ठेवण्यात आला. परंतु त्याची कार्यवाही करण्यामध्ये शिक्षक, मुख्याध्यापक, संस्थाचालक, शासन सर्व घटक कमी पडले. कार्यानुभवासाठी विषय निवडताना स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, स्थानिक गरजा लक्षात घेऊन, स्थानिक नैसर्गिक साधन सपत्तीचा वापर कसा करता येईल, या दृष्टिकोनातून विचार करणे गरजेचे असते. शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे आपले कर्तव्य शासनाने पार पाडले नाही. जिथे विज्ञान प्रयोगशाळा नाहीत, तिथे संस्थाचालक कार्यानुभवासाठी सुसज्ज कार्यशाळा कुठून देणार ? पुरेशा निधी अभावी साहित्याची वानवा अशी या विषयाची केविलवाणी परिस्थिती झाली. सुरुवातीला काही शाळांतून स्टोव्ह दुरुस्ती, इलेक्ट्रिक फिटिंग, ग्रामीण भागामध्ये शेती, सुतारकाम इ. उपयुक्त

विषय निवडण्यात आले. पण पुढे हा उत्साह फारसा टिकला नाही. मुख्याध्यापक देखील, एखाद्या शिक्षकाला त्याच्या वर्क लोडमध्ये दोन तासिका कमी पडताहेत, मग दे एखाद्या वर्गाचा कार्यानुभव, अशा वृत्तीने वागायला लागले. ज्याला स्वतःलाच त्या विषयाची आवड नाही, ज्याच्या जवळ काही कला-कौशल्य नाही, जो अप्रशिक्षित आहे. तो त्या विषयाला काय न्याय देणार ? याचा फायदा काही प्रकाशनांनी घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी कार्यानुभव पुस्तिका बाजारात आणल्या. मग शिक्षक त्या पुस्तिका भरून घेण्याचे कार्य प्रामाणिकपणे, इमाने-इतबारे करू लागले. आणि कार्यानुभवाचा आत्माच हरवल्यामुळे मुले काही व्यावसायिक शिक्षणाकडे वळली नाहीत आणि पदवीच्या आकर्षणामुळे महाविद्यालयांकडे वाहणारा विद्यार्थ्यांचा लोंढा मात्र तसाच वाहत राहिला.

### २) समाजसेवा

सामाजिक बांधिलकीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्याच्या दृष्टीने कोठारी आयोगाच्या शिफारशी प्रमाणे या विषयाचा समावेश करण्यात आला. व्यक्तीच्या विकासामध्ये समाजाचा हातभार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या लागत असतो. या कृतज्ञतेच्या भावनेतून, परत फेड म्हणून समाजसेवा करावयाची असते. एखादे श्रमदान शिबीर आयोजित करणे. शालेय परिसर स्वच्छता इ. गोष्टी या विषयांतर्गत करता येणे शक्य आहे. आणि बऱ्याच शाळा कमी-अधिक प्रमाणात करतही असतात. परंतु समाजसेवेची पुस्तिका भरून घेणे, समाजसेवेची परीक्षा घेणे या गोष्टी आकलनाच्या पलीकडील आहेत. समाजसेवा हा गुण मिळविण्याचा विषय नसून ती वृत्ती विद्यार्थ्यांच्या अंगी निर्माण होणे महत्त्वाचे आहे, हे आपल्याला कळत नाही, या परते दुर्दैव कोणते ? अर्थात सध्याची वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या लक्षात घेता सर्व विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करून त्यांच्यामध्ये परोपकारी वृत्ती, समाजसेवेची वृत्ती निर्माण झालेली आहे की नाही हे ठरविणे तशा नोंदी ठेवणे ही फारच कठीण गोष्ट आहे.

### ३) शारीरिक शिक्षण

या विषयाचे अध्यापन आणि मूल्यमापन पूर्वीपासून त्यामानाने समाधानकारक आहे, असे म्हणायला काहीच हरकत नाही. तरी पण केवळ खेळावरच भर न देता सर्वांगसुंदर व्यायाम, कसरती, योगासने, मानवी मनोरे वगैरे सर्व बाबींकडे पुरसे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेला देखील लांब उडी, उंच उडी, धावणे, सर्वांगसुंदर व्यायाम सर्व गोष्टींची परीक्षा घेणे आवश्यक आहे. परंतु वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे शिक्षकांवर काही मर्यादा पडतात, ही मान्य होण्यासारखी गोष्ट आहे. आता शारीरिक शिक्षणाबरोबरच आरोग्य शिक्षणाचाही समावेश करण्यात आलेला आहे. ही स्तुत्य गोष्ट आहे. परंतु मानवी शरीर विज्ञान, आरोग्यशास्त्र, प्रथमोपचार इ. गोष्टींचे पुरेसे ज्ञान विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे. सद्ध्या इ. ८ वी आणि इ. ९ वी साठी एम्. सी. सी. (महाराष्ट्र छात्र सेना) हा विषय सुरु करण्यात आलेला आहे. मुलांमध्ये शिस्त निर्माण होण्याच्या दृष्टीने हा विषय उपयुक्त आहे, असे मला वाटते. परंतु हा विषय राबविण्यामध्ये देखील शासनाची धरसोड वृत्ती दिसून आलेली आहे. मुलांच्या युनिफॉर्मवर होणारा खर्च, त्याबरोबर त्यांचा धुलाई भत्ता, शिक्षकांचे मानधन यावर होणारा खर्च ह्या गोष्टी बंद केलेल्या आहेत आणि हा विषय आता ऐच्छिक करण्यात आलेला आहे. सुरुवातीला मानधन दिले गेल्यामुळे शिक्षकांची आर्थिक अपेक्षा आता पूर्ण होत नसल्यामुळे ते नाराज झाले आहेत. निरुत्साही झाले आहेत आणि ते मनुष्य स्वभावाशी सुसंगतच आहे. जी गोष्ट शिक्षकांची, तीच गोष्ट विद्यार्थ्यांची. सर्व विद्यार्थ्यांना हा विषय सक्तीचा न करता जे इच्छुक आहेत अशाच ५० विद्यार्थ्यांचे इ. ८ वी चे एक युनिट आणि इ. ९ वी चे एक युनिट तयार करून त्यांच्यावरच लक्ष केंद्रित

करणे एवढेच, मला वाटते, सध्याच्या परिस्थितीमध्ये शिक्षकांना शक्य आहे.

### ४) स्काऊट-गाईड

या विषयाच्या बाबतीत पूर्वीपासून खालपासून वरपर्यंत यंत्रणा कार्यरत असल्यामुळे त्यामानाने समाधानकारक अनुभव आहे. तरी पण प्रगतीला बराच वाव आहे. स्काऊट-गाईडच्या युनिफॉर्ममध्ये मिरवणे एवढाच माफक हेतू मनात न ठेवता, विद्यार्थ्यांमध्ये खऱ्या अर्थाने बालवीरवृत्ती कशी निर्माण होईल, याकडे स्काऊट-गाईड शिक्षकांनी लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांची नियमित परेड घेणे, या विषयाचे मूल्यमापन कसे करता येईल. स्काऊट-गाईड शिबीराचे यशस्वी आयोजन याकडे पुरेसे लक्ष देणे आवश्यक आहे.

### ५) मूल्यशिक्षण

या विषयाचा समावेश शासनाने हल्लीच केलेला आहे. सामाजामध्ये नैतिक मूल्यांची घसरण होत चाललेली आहे, सामाजिक नीतीमत्ता दिवसेंदिवस ढासळत चाललेली आहे. याची जाणीव शासनाला झाल्यामुळे या विषयाचा अंतर्भाव करण्यात आलेला असावा. परंतु शासनाचा हेतू कितीही स्तुत्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीचा हा मार्ग नव्हे. मुळात काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात, ते असे यापूर्वी शिक्षक मुलांना मूल्ये शिकवत नव्हते असे म्हणावे का ? मुलांना 'तुम्हाला मी हे मूल्य शिकवतो' असे सांगून एखादे मूल्य शिकवणे, हे कितपत सयुक्तिक आहे ? मूल्यांची जोपासना ही प्रत्यक्ष शिकवून होत नसते. शिक्षकाच्या चालण्या-बोलण्यातून, वागण्यातून अनेक मूल्यांचा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर होत असतो. भाषा विषय, इतिहास इ. विषयांच्या अध्यापनातून अप्रत्यक्षरित्या शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंगी विविध मूल्ये रुजवत असतोच. सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव, प्रदर्शन शैक्षणिक सहली, विविध स्पर्धा इ.सहशालेय कार्यक्रमांद्वारेही मुलांमध्ये अनेक मूल्ये रुजविणे सहज शक्य आहे. मूल्यशिक्षणाची परीक्षा घेणे, ही तर न पटणारी गोष्ट आहे. एखादा सुविचार माहीत असणे आणि तो आचरणात आणणे, यामध्ये जो फरक आहे, तोच फरक एखादे मूल्य माहीत असणे आणि ते अंगी बाळगणे, आणि त्याप्रमाणे आचरण करणे, यामध्ये आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे निरीक्षण करून तशा नोंदी ठेवणे, हाच खरा उत्तम मार्ग आहे. अर्थात वाढती विद्यार्थीसंख्या लक्षात घेता सर्व दहाही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली आहेत की नाहीत, हे ठरविणे फार कठीण गोष्ट आहे, हे निर्विवाद!

### ६) सामान्यज्ञान

या विषयाचा अंतर्भाव देखील हल्लीच करण्यात आलेला आहे आणि तो स्तुत्यच आहे. कारण पदवीधर व्यक्तींचे सामान्यज्ञान देखील किती अपुरे असते, याचा अनुभव नोकरीच्या निमित्ताने घेतल्या जाणाऱ्या मुलाखतींच्या वेळी येतो. या विषयाचे इतर विषयांप्रमाणे अध्यापन करणे शक्य आहे. तसेच इतर विषयांप्रमाणे या विषयाचे मूल्यमापन देखील शक्य आहे. प्रत्येक विषय शिक्षकाने अध्यापन करताना पाठ्यपुस्तका बाहेरील अवांतर माहिती विद्यार्थ्यांना पुरविली तर त्यांच्या सामान्यज्ञानामध्ये चांगली भर पडू शकेल. शिवाय मुलांनी वर्तमानपत्रे वाचावीत. टी. व्ही. वरील बातम्या ऐकण्यात, शैक्षणिक कार्यक्रम, डिस्कव्हरी चॅनेल, ॲनिमल प्लॅनेट, नॅशनल जिऑग्राफिक चॅनेल इ. वाहिन्यांवरील विज्ञान विषयक कार्यक्रम अवश्य पहावेत, असा आग्रह शिक्षकांनी धरला पाहिजे आणि वरील गोष्टी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले पाहिजे.

### ७) पर्यावरण

या विषयाचा अंतर्भाव देखील हल्लीच करण्यात आलेला आहे. निसर्गाचा समतोल राखला पाहिजे,

पर्यावरणाचे जतन, संरक्षण आणि संवर्धन केले पाहिजे. प्रदूषण नियंत्रित केले पाहिजे, याची जाणीव निर्माण होणे ही एकविसाव्या शतकाची गरज आहे आणि त्या दृष्टीने या विषयाचा समावेश शासनाने केलेला असावा. तरी पण इथेही अंमलबजावणीचा मुद्दा राहतोच. या विषयाचे अध्यापन पूर्वी शिक्षक करत नव्हते का ? एक स्वतंत्र विषय आणि त्यासाठी एक स्वतंत्र वेगळी तासिका देण्याची खरोखरच गरज आहे का ? भूगोल, विज्ञान इ. विषयांमध्ये पर्यावरण, प्रदूषण, नैसर्गिक साधनसंपत्ती वगैरे घटक शिकवताना अप्रत्यक्षरित्या हा विषय शिक्षक शिकवतातच. केवळ परीक्षेच्या दृष्टीने हा विषय वर्गाच्या बंदिस्त खोलीमध्ये चार भिंतींच्या आड न शिकवता मुलांना भोवतालचा परिसर पाहू द्यावा, भोवतालचा परिसर स्वच्छ राखला पाहिजे, ही जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण करावी. प्रदूषण कमी करण्यासाठी आपण काय करू शकतो, याची कल्पना वृक्षारोपणासारखा कार्यक्रमांद्वारे त्यांना देण्याचा प्रयत्न करावा.

आणखी एका नवीन श्रेणी विषयाची भर पडणार आहे, ती म्हणजे माहिती-तंत्रज्ञानाची. कार्यानुभवांतर्गत 'संगणक' हा विषय सक्तीचा करण्यात आलेलाच आहे. हे सर्व विषय महत्त्वाचे आहेत, या बाबत दुमत नाही. पण प्रश्न आहे, तो कार्यवाहीचा, अंमलबजावणीचा. 'अनौपचारिक शिक्षण' हा देखील शिक्षणाचा एक भाग आहे, ह्याचा सोयीस्कर विसर शासनकर्त्यांना आणि शिक्षणतज्ज्ञांना पडलेला दिसतो. ज्यामध्ये पालक आणि समाजातील इतर व्यक्तींचे साहाय्य घेणे सहज शक्य आहे. शिक्षणामध्ये 'समाजाचा सहभाग' हा अभिप्रेत आहेच. हे सर्व श्रेणी विषय महत्त्वाचे आहेत, आवश्यक आहेत. याबद्दल शंका नाही. परंतु त्यांचे अध्ययन आणि मूल्यमापन या क्षेत्रामध्ये सुधारणेला बराच वाव आहे. इंग्रजी, गणित इ. प्रतिष्ठित विषयांप्रमाणे या विषयांकडे सर्व समाज आणि स्वत: शिक्षक सन्मानाने पाहील आणि पाट्या टाकण्याची वृत्ती सोडून देऊन अधिक उत्साहाने, अधिक तळमळीने, अधिक अभ्यासपूर्वक या विषयांचे अध्यापन करण्याचा प्रयत्न करील, त्याचवेळी या विषयांची दुरवस्था संपेल असे मला वाटते.

श्री. प्र. द. अरदरकर
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

***

### पाणी वाचवा ..... जीवन वाचवा

* दोन-चार घोट पाणी प्यायचं असेल तर ग्लास भरून पाणी घेतो आणि थोडसं पिऊन बाकीचं फेकून देतो.

* गृहिणी किंवा मोलकरीण घरकाम करताना विशेषत: भांडी-कपडे धुताना नळ चालू ठेवतात.

* काहीजण वॉश-बेसिनच्या समोर उभं राहून ब्रश करताना नळ चालू ठेवतात.

* आंघोळीच्या वेळी बादली भरून वाहत असते, तरी चटकन नळ बंद करण्याची तसदी कितीजण घेतात? आंघोळीला बाथरूममध्ये गेल्यावर बादलीत अर्ध पाणी भरलेलं आढळलं, तर पुन्हा बादली भरायला लावली जाते.

* बऱ्याचशा हाऊसिंग सोसायटीत पाण्याचं सामूहिक बिल येतं. त्यामुळे इतरांच्या घरात जास्त माणसं असूनही तेवढचं बिल. तेव्हा पैसे मोजतोच आहे तर वापरा पाणी वाट्टेल तसे, असा स्वार्थी आपमतलबी विचार करून देखील पाण्याचा बेताल वापर केला जातो.

# ऋत

> 'ऋत' हा शब्द, या शब्दातील 'ऋ' चे महत्त्व, इतर भाषांतील त्याचा आढळ या संबंधीचे हे विवेचन. - संपादक

रशियातील स्टेप्सच्या गवताळ-मैदानी भागातून निघून मध्य-आशियात काही काळ वास्तव्य करून सप्तसिंधूच्या खोऱ्यापर्यंत मार्गक्रमण करणाऱ्या आर्यांच्या जीवनात 'ऋ' या गतिवाचक धातूचे फार महत्व असावे हे स्वाभाविकच म्हणायला हवे. आर्य हे मुळात भटके-फिरस्ते (nomadic) होते. म्हणूनच त्यांना 'अर्य' (फिरणारे, सतत हालचाल करणारे) असे म्हणत. अर्थामध्ये कोणताही बदल न होता केवळ पहिल्या 'अ' या स्वराची वृद्धी होऊन 'अर्य' या शद्बाचे 'आर्य' असे रुप रुढ झाले. 'अर्य' या पदाचा स्वतःचा जो अर्थ तोच 'आर्य' या पदाचाही. म्हणूनच अशा वृद्धीला 'स्वार्थे वृद्धिः' म्हणतात. प्रकर्षाने जो जाणतो तो 'प्र-ज्ञ' व 'प्रज्ञ' याचेच स्वार्थे वृद्धीने रुढ झालेले 'प्राज्ञ' हे रुप असेच आहे.

'अर्य' या शद्बात मूळ धातू 'ऋ' आहे. जो गतिमान तो अर्य-आर्य. 'ऋ' हा गतिवाचक धातू आहे. (''ऋगतौ''). गतीत विविध प्रकारच्या 'गती' अभिप्रेत आहेत. 'प्रगती' (progress), 'अवगति' (understanding) एखाद्या विषयाचे ज्ञान असणे. त्या व्यक्तीचा निर्देश करतांना आपण त्याला त्या शास्त्रात 'गती' आहे असे म्हणतो. आर्य टोळ्या पुढे पुढे येऊ लागल्यावर सहाजिकच त्या त्या प्रान्तातील आर्यांच्या रहिवाशांसाठी त्यांना ''दोन हात'' करावे लागले. टक्कर देणे याला encounter म्हणतात. टक्कर देतो तो शत्रू म्हणून 'अरि' या शद्बाचा अर्थही जो लढा देतो 'तो' 'one who encounters' असा होतो.

व्यक्ती व टोळ्या यामध्ये ज्याप्रमाणे गती आढळते तशीच सृष्टीत ती सर्वत्र आढळते. 'ऋ' या धातूपासून 'ऋत' हे कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण तयार होते. 'ऋत' म्हणजे 'विश्वातली सुव्यवस्थित गती'. नद्या वरल्या अंगाकडून खालल्या अंगाला वाहतात. (निम्न-गा म्ह नदी.), पृथ्वी स्वतःभोवती विवक्षित गतीने फिरते व सूर्याभोवती फिरते. वायू हा सदा वाहत असतो. (सदागतिः म्ह. वायू). सूर्याचे किरण फैलावतात (सूर्य हा तेजोरुप आहे.) थोडक्यात पृथ्वी, आप, तेजस्, वायू हे सर्व गतिमान आहेत. विश्वामध्ये अव्यवस्था (Chaos) नसून सुव्यवस्था, नियमितपणा (नियती) असते. सृष्टी ही Cosmos आहे. या तत्वाला ऋग्वेदात 'ऋत' म्हटले आहे. सृष्टीतील सर्वच देवता या ऋताचे पालन करणाऱ्या आहेत. विशेषतः वरुण या देवतेला खास 'ऋतावान्' या उपाधीने गौरवले गेले आहे. उषा नियतवेळी क्षितिजावर उगवते. ती ऋताची निवड (वृ-निवडणे to choose म्हणून 'पति' म्हणून निवडलेला तरुण 'वर'.) करते, पालन करते म्हणून तिला 'ऋतावरी' म्हणतात. भाषिक विकास क्रमात 'ऋत' या शद्बाला 'सत्य' असा अर्थ प्राप्त झाला. 'ऋतं वदिष्यामि, सत्य वदिष्यामि'' असे उपनिषदे म्हणतात. अनृत म्हणजे असत्य. पृथ्वी ही सत्यावर तर द्यौः ऋतावर अधिष्ठित आहे अशी वैदकांची धारणा आहे. (सत्येनोत्तभिता भूमिः ऋतेनोत्तभिता द्यौः)

उपनिषदातील 'ऋत' या तत्त्वाची दोन ठळक उदाहरणे देतो. '' परमतत्त्वाच्या प्रशासनामुळे, हे गार्गि, या पूर्वेकडील नद्या वाहत असतात'' (एतस्य वा अरे अक्षरस्य प्रशासने, गार्गि प्राच्योऽन्याः नद्यः स्यन्दन्ते). 'अक्षराचे प्रशासन' म्हणजे 'ऋतच'. शतपथ ब्राह्मणातील उदाहरण या ही पेक्षा बहारीचे आहे. शतपथ ब्राह्मण म्हणते. ''पाणी वाहते, सूर्य फिरतो, चंद्र फिरतो, नक्षत्रे परिक्रमा करतात.

या देवतांनी आपली गती सोडली, क्रिया सोडल्या असे त्या दिवशी होईल ज्या दिवशी ब्राह्मण आपले वेदाध्ययन करण्याचे सोडून देईल'' (यन्ति वा आपः एति आदित्यः, एति चन्द्रमाः, यन्ति नक्षत्राणि, यथ् ह वा एताः देवताः नेयुर्न कुर्युस्तदहस्तद् ब्राह्मणो भवति यदहः स्वाध्यायं नाधीते।)

ब्राह्मणाने स्वाध्याय सोडणे म्हणजे सृष्टिचक्राला खीळ बसणे ही कल्पना फार बोधप्रद व बहारीची आहे. 'ब्रह्म' म्हणजे 'वेद' ब्रह्माचा अभ्यास करणारा जो कोणी असेल तो ब्राह्मण! जातिवाचक संकुचित अर्थ घेऊ नये. 'ऋ' धातूचे 'ऋत' या प्रमाणे दुसरे वैकल्पिक क. भू. धा वीचे रूप आहे 'ऋण' जे 'वाहते असते'. हा केवळ योगायोग नाही की आंग्लभाषेतला (पळणे) हा शद्ब भाषिक दृष्ट्या 'ऋण' शी संबंध आहे हा running into debt हा वाक्यप्रयोगही विचारात घेण्याजोगा आहे. जेथे सतत पाण्याची हालचाल व खळबळ होत असते त्या सागराला संस्कृतात 'अर्णव' म्हणतात ते गतिमानतेमुळेच.

आपल्याला आश्चर्य वाटेल पण इंग्लीश मधला Art (कला) हा शद्ब ऋतशी संबद्ध आहे. कलेत सुव्यवस्था, नीटसपणा असतो. लॅटिन art या शद्बापासून इंग्लीशमध्ये हा शद्ब आला आहे. वैदिक भाषेतील ऋत, ऋतु (बदलणारा), ऋचित्रू (काम करणारा, क्रियाशील) या शद्बांपाठीमागे 'ऋ-ऋत' हा शद्बच आहे. लॅटिन ars याचा अर्थ 'निष्णात', हस्तकला प्रवीण' असा आहे. हा ars त्याच भाषेतल्या artus म्ह. 'सांधा' (joint) याच्याशी संबंद्ध आहे. वैदिक भाषा, लॅटिन, फ्रेंच, इंग्लिश या शब्दांपाठी मागील युरो-भारतीय (Indo-European.) उत्प्रेक्षित ar असा त्याचा अर्थ 'सांधा जोडणे', 'व्यवस्थित मेळ घालणे हा आहे. शद्बांचा सुयोग्य मेळ हे कलात्मक शद्ब रचनेचे लक्षण आहे. म्हणूनच काव्याच्या अनेकविध लक्षणात 'proper words in their proper order' विधात्याच्या सृष्टीत जसे सुव्यवस्थित ऋत आहे तसेच शद्बसृष्टीच्या ईश्वराच्या (कवीच्या) निर्मितीत सुव्यस्थित शद्बरचना आहे. 'ऋतिः' या नामाशी 'रीत' हा संस्कृत शद्ब संबंध आहे. 'रीतिरात्मा काव्यस्य' असे वामनाचार्य म्हणतात. जर्मन-प्राच्यविद्याविशारद श्लेराय याने 'ऋत' या शद्बाचा अर्थ "die rechte zusammenfugung" (the right fusing together) असा दिला आहे. आपला खांदा खोबणीत नीट बसवलेला असतो म्हणून त्याला arm म्हणतात. धावात 'अरे' बसवलेले असतात म्हणून ते 'अराः'(spokes). right, rite, route हे शद्ब ऋ व ऋत यांच्याशी संबद्ध आहेत. अवेस्तात ऋत चे asa असे रूप होते पण Artaxerses 'सारख्या नावात 'Art' व 'ऋत' दिसून येतात. वैदिक साहित्यातही 'आर्तभाग' नावाची व्यक्ती आहे. आर्य याचे प्राकृत रूप 'अय्य' असे होते. अय्यर व अय्यंगर यांच्याशी त्याचा संबंध आहेच पण महाराष्ट्री मुलींच्या तोंडी असलेल्या 'अय्या!' शीही आर्य संबंध आहे.

श्री. डॉ. मो. गो. धडफले
सदानिका- क्र. २, यशोदीप - ब,
रामबाग वसाहत सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०
दूरध्वनी : ४३३ २०८१

***

# श्रीमद् भगवत् गीता अध्याय ७ वा ।। ज्ञानविज्ञानयोगः ।।

*सर्व घराघरांसाठी, घरातील सर्वांसाठी 'श्रीमद् भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी. - संपादक*

गीतेच्या सहा-सहा अध्यायांचे तीन भाग करायचे ही फार प्राचीन काळची पद्धत आहे. पहिल्या सहा अध्यायात व्यक्तीगत जीवनात 'आत्मदर्शन' घ्यावयास सांगितले आहे. प्रथम वस्तू वस्तूतील आत्मदर्शन 'सर्वाभूती परमेश्वर' ही भावना जागृत झाल्यानंतर सर्व वस्तूजाता मागील एकच परमात्मतत्त्वाचे दर्शन. त्या परमात्मदर्शनानंतर त्याच्याशी आपले अत्यंत जवळचे जिव्हाळ्याचे नाते कसे निर्माण होईल याचेही ज्ञान याच अध्यायात करून दिले आहे.

सातव्या अध्यायाच्या सुरुवातीलाच 'माझे समग्र दर्शन' घडवितो असे भगवंताने म्हटले आहे. सहाव्यात 'तू योगी हो' असे अर्जुनाला म्हटले आहे. त्यासाठी योगाभ्यास आवश्यकच. योगाभ्यासानेच परमात्म्याचे ज्ञान होणे शक्य आहे. तो योगाभ्यास कसा करायचा हेही सहाव्यात सविस्तर सांगितले आहे. ज्ञान व विज्ञान मिळून परमात्म्याचे समग्र ज्ञान तोच या अध्यायाचा विषय आहे. काम-क्रोध ज्ञान विज्ञानाचा नाश करतात असे तिसऱ्या अध्यायात म्हटलेले आहे. त्या कामक्रोधाचा नाश योगाभ्यासाने होतो, त्यामुळे ज्ञान विज्ञान कळते. ते आकलन झाले की परमात्म्याचे समग्र दर्शन होते. त्यामुळे योगाभ्यास आवश्यक आहे.

परमेश्वर सर्व विश्वात भरलाय हे माहीत सर्वांनाच आहे. पण त्याची अनुभूती योग्यालाच येऊ शकते. साखर शब्द लिहून वा उच्चारून साखरेची गोडी कळते का ? ती अनुभवावी लागते. हो ना ! तसेच परमेश्वराचा अनुभव योगाभ्यासावाचून येऊ शकत नाही. परमेश्वराचे दर्शन इंद्रिय पातळीवर होऊ शकणार नाही. अनुभव मनाने घ्यायचा असतो. मनाने दर्शन पंचेंद्रियांद्वारे होत नाही, मनानेच मनाचे दर्शन होते.

गीता सांगते - इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ-मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ- बुद्धिपेक्षा अहंकार श्रेष्ठ- अहंकारापेक्षा आत्मा श्रेष्ठ (ही श्रेष्ठता उत्तरोत्तर सूक्ष्मता दर्शवणारी आहे, परमात्म्याचे दर्शन होण्यासाठी या आत्मपातळीवर उतरायला पाहिजे. यासाठीच भगवंत सुरुवातीलाच 'तू योगी हो' असे आवर्जून सांगतात.

या अध्यायाचे नाव 'ज्ञानविज्ञानयोग' आहे. तेव्हा ज्ञान म्हणजे आत्मज्ञान व विज्ञान म्हणजे विश्वज्ञान हे प्रथम समजून घेऊ.

ज्ञान-आत्मज्ञान
पराप्रकृती, परमात्मतत्त्व

विज्ञान - विश्वज्ञान
अपरा प्रकृती, त्रिगुणात्मक अष्टधाप्रकृती
पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश
(ही पंचमहाभूते त्रिगुणात्मक)
+ मन - बुद्धी - अहंकार
= अष्टधाप्रकृती
त्रिगुणात्मक - सत्व-रज-तम यांनी युक्त

मी तुला विज्ञानसह संपूर्ण ज्ञान सांगतो असे भगवंत म्हणतात. आणि हे ज्ञान झाले की मग जगात आणखी काही जाणावयाचे शिल्लकच रहात नाही. म्हणून नीट ध्यान देऊन ऐक -

**ज्ञान-आत्मज्ञान** - समर्थांच्या शब्दात 'ओळखावे आपणासी आपण' हे आत्मज्ञान ! स्व-रूपाचे ज्ञान (सूक्ष्मतम तत्त्वाचे म्हणजेच परमात्म्याचे ज्ञान)

**विज्ञान-विश्वज्ञान** - विश्वातील विविधतेचे ज्ञान. या दोहोचे नाते या अध्यायात भगवंत उलगडून दाखवणार आहेत. म्हणून अध्यायाचे नाव 'ज्ञानविज्ञान योग'. या ज्ञान

विज्ञानाचे परमात्म्याचे समग्रज्ञान होऊ शकते अन्यथा नाही, ते व्हावे असे वाटत असेल तर योगाभ्यास करून ज्ञानविज्ञान जाणून घ्यायला हवे. म्हणजेच 'योगावर आरुढ' होऊन ज्ञानविज्ञान जाणून घ्यायला हवे. म्हणजेच 'योगावर आरुढ' होऊन ज्ञान विज्ञान तृप्तात्मा होणे आवश्यक आहे. ही पात्रता अंगी येण्यासाठी योगाभ्यास करावयास हवा. हे खरे आहे की हजारो माणसांतून एखादाच परमात्म प्राप्तीसाठी प्रयत्न करतो. आणि त्यातूनही एखादाच मला जाणतो. सर्वसामान्य लोक आयुष्य उपभोगण्यात, खा-प्या मजा करा यातच गुरफटलेले असतात, कारण 'योग' साध्य व्हायला वरीच वर्षे काय जन्मही लागतात, त्यामुळे हे कार्य अत्यंत अवघड आहे. योगाभ्यासापर्यंत त्यातले कोणी पोचले तरी परमात्म्याच्या अनुभूतीपर्यंत एखादाच पोचतो.

ज्ञान म्हणजे परा प्रकृती व विज्ञान म्हणजे अपरा प्रकृती. ही अपरा प्रकृती त्रिगुणात्मक आहे. सत्त्व-रज-तम हे त्रिगुण परमात्मतत्त्वापासून बनले आहेत. परमात्मतत्त्वावर आधारलेले आहेत. पण परमात्म्याची दैवी माया, या मायेमुळेच जग मोहीत होऊन 'परम' 'अव्यय' (नित्य) अशा तत्त्वाला जाणू शकत नाही. त्यामुळे आसुरी वृत्ती, मूर्खता वाढते. इच्छा-द्वेष (काम-क्रोध) या द्वंद्वाचा मोह किंवा त्रिगुणांचा पडदा दूर करण्यासाठी परमात्मतत्त्वालाच शरण गेले पाहिजे.

प्रत्येकाच्या अंतर्यामी ईश्वर शक्ती आहेच. या स्वतःतील दिव्यशक्तीची जाणीव करून देण्यासाठीच आणि त्या कार्यातून ईश्वरीकार्य सिद्ध होत असल्याचे सत्य अर्जुनाच्या मनावर ठसवण्यासाठीच श्रीकृष्णावताराचे उद्दिष्ट होते. परा प्रकृती व अपरा प्रकृती या दोहोच्या संयोगातून (पुरुष+प्रकृती) हे विश्व निर्माण झालेय.

विनोबाजी परमेश्वर (चैतन्य, पुरुष) त्रिगुणात्मक अशा प्रकृतीतून हे विविध रंगी-विविध ढंगी विश्व कसे निर्माण करतो त्यासाठी पुढील काही समर्पक उदाहरणे देतात.

१) एक कागद व एक पेन्सिल घेऊन चित्रकार नाना भावभावनांचे प्रकटीकरण करणारे साहित्य निर्माण करतो.
२) एक सतार, सात सूर त्यातून वादक निरनिराळे भाव प्रकट करणारे सूर आळवतो.
३) कागदावर ५२ अक्षरातून लेखक नाना भावभावनांचे प्रकटीकरण करणारे साहित्य निर्माण करतो.

ही चित्रे निर्माण करण्याची खुबी चित्रकाराच्या बोटात आहे. सूर उमटविण्याचे कसबही वादकाच्या बोटात आहे. तसेच शब्दातून साहित्य निर्मिल्याचे कौशल्य लेखकाचे आहे.. हीच खुबी, कसब, कुशलता त्या सृष्टिनिर्मात्यात आहे. अनेकविध वस्तू, माणसे, प्राणी, पदार्थ तो निर्माण करतो, त्यात माझे, परके हे भाव निर्माण होतात. त्यामुळे मनुष्य कर्तव्य विसरतो, टाळू बघतो. हे सर्व टाळायचे असेल तर भगवंत म्हणतात, या मायेतून तरून जायचे असेल तर मला शरण येणे आवश्यक आहे. ज्याने ही माया निर्माण केलीय त्याची किमया जाणून घेण्यासाठी त्या किमयागारालाच सर्वथः शरण गेले पाहिजे. त्याला समजून घेण्याचे महान साधन थोर विकर्म सांगण्यासाठीच या सातव्या अध्यायात भगवंताने भक्तीचे भव्य दालन उघडले आहे.

चित्तशुद्धीसाठी यज्ञ, दान, जप तप, ध्यान धारणा इ. विकर्मे सांगितली आहेत. त्याला विनोबाजी साबण, सोडा रिठा म्हणतात. व भक्तीला शुद्ध, निर्मळ पाणी म्हणतात. या भक्तीच्या पाण्याशिवाय त्या साबण सोड्याचा काय उपयोग ? नुसते भक्तीचे निर्मळ पाणी पण चित्तशुद्धी करून शकेल शिवाय हे साबण सोडे असले तर 'अधिकस्य अधिकं फलम्' दुधात साखर, सोन्याला सुगंध.

यज्ञ याग, जप तप, ध्यान धारणाही भक्तीतून निर्माण व्हायला हवी. (भक्ती मनातून निर्माण होते). भक्ती म्हणजे प्रेम, जिव्हाळा. एखादी व्यक्ती सेवाशास्त्र शिकलीय पण सेवा करतांना प्रेम, कळकळ जिव्हाळा नसेल तर ती सेवा होईल का ? सफरचंद ज्याने खाल्लेय तो मातीचे रंगीत

सफरचंद कितीही सुंदर दिसत असले तरी ते खायला जाईल का ? आत्मज्ञानाची गोडी ज्याने चाखलीय तो या प्रकृतीत कशाला रमेल ? खऱ्या ब्रह्मानंदाचा आम्हाला पत्ता नाही आहे म्हणून आम्ही क्षणिक सुखाच्या मागे लागतो. तरीही ते मिळालेच नाही तर दारू, सिगारेट, गर्द जवळ करून दुःखापासून दूर पळतो. खरे दूध माहीत नव्हते म्हणून अश्वत्थामा पीठ कालवलेले पाणी दूध म्हणून प्याला.


खरा आनंद शोधण्याचा उत्तम मार्ग म्हणजे भक्ती. परमात्मा हा सत्-शाश्वत, अविनाशी, अव्यय, नित्य. विश्वातील कोणतीही वस्तू नाश पावत नाही. रुपान्तरित होते. परिवर्तन होते.

चित् - चैतन्य, गतिमानता. रुपान्तरीत होण्याची क्षमता, उदा. पर्वत-दगड-खडी-माती-मूर्ती वगैरे.

आनंद - ज्ञानाची जाणीव, अनुभूती, ही विकसन ज्ञान प्रक्रिया, हा बदल जाणिवेतून होतो. सत्, आनंद अनाकलनीय आहे.

मातीचा घट बनतो, म्हणजे पूर्वी तो माती होतो. आताही मातीचाच घट आहे. घट फुटल्यावरही पुन्हा मातीच. माती तिन्ही अवस्थेत असतेच. निर्मिती घटाची होते. विनाश देहाचा होतो. आत्मा जन्ममृत्यू-रहित, अमर असतो. दुसरं उदाहरण पाहू. दागिना सोन्याचा बनतो, दागिना हा बनल्यावरही सोनंच असतो. मोडल्यावरही सोनंच. तसाच परमात्मा हा सच्चिदानंद स्वरुप असतो. या परमात्म्याच्या प्राप्तीचा मार्ग भक्ती.

**चार प्रकारचे भक्त**




आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, ज्ञानी हे चारीजण अमरत्वाची धडपड करणारे, एकाच बोटीतील प्रवासी. आर्त, जिज्ञासू अर्थार्थी या पायऱ्या चढून आल्यावर अखेरीला 'वासुदेवःसर्वत्र' असे जाणून तो मला भजतो. तोच ज्ञानी भक्त. विश्वातील एकात्मतेचा आनंद घेणारा, सच्चिदानंद स्वरुप परमात्म्याचा आनंद अनुभवणारा ज्ञानी भक्त सर्वात श्रेष्ठ. तोच भगवंताला प्रिय. 'परमात्म्याचे समग्र दर्शन' ते हेच.

त्रिगुणामुळे (अपरा प्रकृती), अष्टधा प्रकृतीमुळे (स्थूल विश्व) परमात्मदर्शन अवघड असले तरी परमात्मतत्त्व मात्र स्थूलासहच आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. पराप्रकृतीनेच अपरा प्रकृती धारण केली आहे. सारे विश्व एकाच चैतन्य सूत्राने गुंफलेले आहे. कुठलीही वस्तू ह्या सूत्राबाहेर स्वतंत्र नाही.


कर्माच्या लौकिक आदर्शाकडून अलौकिक आत्मिक जीवनादर्शाकडे भगवंताने पायरी पायरीने अर्जुनाला नेले आहे. कर्मयोग सर्वात्मक आणि सर्व व्यापकता आहे. स्वामी विवेकानंदांनी तर एका वाक्यात गीतार्थ सांगितला आहे. उच्च गोष्टीच्या लाभासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाचे प्रतीक म्हणजे 'गीता'.

या अध्यायात 'मी तुला ज्ञान विज्ञानासह संपूर्ण ज्ञान सांगतो. हे ज्ञान झाले की मग त्या पलीकडे जाणण्यासारखे दुसरं काहीच रहात नाही' असंच भगवंत म्हणतात. पण परमात्मा सर्वांनाच समग्रपणे आकलन होत नाही. कारण कामना पूर्तीत लोक अडकलेले आहेत, रमलेले आहेत. अल्पबुद्धी लोक स्वार्थासाठी खंडाई, यमाई, मरी आई, इंद्र, वरुण, अग्नि वगैरे देवतांच्या व पंचमहाभूतांच्या पूजा बांधतात यज्ञ करतात, त्यात बळी देतात, ही अंधश्रद्धा अजूनही समूळ नाहीशी झालेली नाही. काही गावात पाऊस पडण्यासाठी अजूनही गाढवांची लग्ने लावली जातात. तसेच बळी देण्याचे बाबा बंगाली प्रकरण आपण वर्तमान पत्रात

आजही वाचतो. दुष्ट, आसुरी प्रवृत्तीचे लोक, मूर्ख लोक, कामना पूर्तीसाठी असे यज्ञ बळी वगैरे प्रकार अवलंबितात, त्यांना तात्पुरते भोग मिळतात. मूळ चैतन्याचा शोध कोणीच घेत नाहीत. चैतन्याचा शोध बुद्धीपलीकडचा आहे. हजारात एखादाच योगी होतो व मला प्राप्त होतो. हे फार अवघड काम आहे. आज सगळ्यांना 'इन्स्टंट फूड' हवे. स्पून फिडींग हवे. कष्ट करण्याची कोणाची तयारी नाही. अभ्यासाला 'गाईड' हवे उत्तरे तयार हवीत. कोणाला वेळ नाही. म्हणून या बरवरच्या पूजेचे फळही तात्पुरतेच मिळते. हे लक्षात ठेवावे. जगातील सारे ज्ञान, संशोधन अपरा प्रकृतीचेच, जडाचेच, इंद्रियगम्य आहे. पराप्रकृतीचा अभ्यास, संशोधन करणारे विद्यापीठ या पृथ्वीवर कुठेच नाही. त्या दृष्टीने ज्ञानाची वॉवच आहे. अशी खंत भगवंत व्यक्त करतात. 'भगवंत' गीतेतील कर्मयोगाचे व्यापक अधिष्ठान आहे.

ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैव, अधिदेव, अधियज्ञ या सहा तत्त्वांचे परमात्मतत्त्व आहे, याचे सविस्तर विवेचन आठव्यात येणार आहे. इथे फक्त त्याचा उल्लेख केला आहे. याच सहा तत्त्वातून विश्वनिर्मिती होते. व विश्वप्रक्रिया चालू राहाते. सामान्यलोक जो अव्यक्त परमात्मा आहे तोच पूर्णपणे विश्वरुपाने प्रगट झालाय असे समजतात. खरे तर व्यक्त झालेले विश्व म्हणजे माझ्या चैतन्य तत्त्वाचा एक बिंदू आहे. व्यक्त झालेले विश्व ही त्रिगुणात्मक प्रकृती परमात्म्याची योगमाया आहे. विश्वाचे स्वरुप स्थलकालात प्रत्ययास येते. स्थूल ही परमात्म्याची एक बाजू (दृश्य) व काळ ही (अदृश्य) परमात्म्याची दुसरी बाजू आहे.

विश्व म्हणजे फक्त हे (दृश्य) स्थूलजग नव्हे




**ज्ञान** - पराप्रकृती (परमात्मतत्त्वाचे ज्ञान)

**विज्ञान** - विश्वाचे इंद्रिय गम्य स्वरुप. हा इंद्रियगम्य अनुभव विविधतेचा आहे. आकाराचा, स्थूल-जडतेचा, परिवर्तनाचा, गतिमानतेचा, जन्म मृत्यूचा. सर्व जगताच्या उत्पत्तीचे व प्रलयाचे मूळ कारण मी आहे. परा व अपरा प्रकृतीच्या संयोगातून ही सर्व भूते निर्माण झालेली आहेत. सर्वभूते एका चैतन्य सूत्रात बांधलेली आहेत. पृथ्वी, चंद्र, मंगळ, बुध हे ग्रह गुरुत्वाकर्षणाने बांधलेली आहेत. कोणीही स्वतंत्र नाही.

आता अपरा प्रकृतीत परा प्रकृतीचे दर्शन तुला मी घडवतो. त्याकडे तू नीट लक्ष दे. असे अर्जुनाला ते बजावतात. हे बघ पृथ्वीतील गंध मी आहे, पाण्यातील रस मी आहे, चंद्र सूर्याचा प्रकाश मी आहे, भूतांचे जीवन मी आहे, वेदातील ओंकार (वेद वायू रुप असतात) प्रणव मी आहे, आकाशातील शब्द, पुरुषातील पौरुष्य, अग्नीतील तेज, बुद्धीमतांची बुद्धी, तपस्यांचे तप, योग्यांचे सामर्थ्य मी आहे, प्राणीमात्रांतील ज्ञान मी आहे. याचा अर्थ मन बुद्धी अहंकार ही स्थूल आणि सक्ष्म यांच्या सीमा रेषेवर आहेत. जर ती स्थूलाशी (देहाशी) जोडली गेली तर 'अपरा' होतात आत्म्याशी जोडली गेली तर सूक्ष्म 'परा' होतात. आपणाजवळ असलेली अतिंद्रिय शक्ती 'बुद्धी' हीच आहे. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, पितळेतील हीण-कीटण काढून टाकले तर पितळ सोनेच होईल की ! तसेच मन-बुद्धी-अहंकारातील स्थूलता, जडता नाहीशी झाली तर ते 'चैतन्य' च होणार नाही का ?

त्रिगुणांची निर्मिती भगवंतापासून होते व जड विश्व ही त्रिगुणात्मक अष्टधा प्रकृतीचे बनले आहे. त्रिगुण = सत्व-रज-तम

सत्वगुण -परिवर्तन शीलता, रजोगुण - गतिमानता, वेग तमोगुण - स्थूल, जड, विविध आकार सृष्टीतील पदार्थ (अणु-परमाणू कमालीचे गतिमान आहेत.

त्यात नित्य परिवर्तन होतेय व ते जडाकडून सूक्ष्माकडे विकास पावते आहे. मायेच्या आवरणामुळे निराकार, शाश्वत, अपरिवर्तनीय परमात्मा अनुभवास येत नाही. जड चेतनात्मक सर्व विश्व ही भगवंताची निर्मिती आहे. तरीही तमोगुणात (स्थूल सृष्टीत) चैतन्य लोप पावलेले आहे. तमोगुण चैतन्यापासून निर्माण होऊनही चैतन्याचे दर्शन घडू देत नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी याबाबत उत्कृष्ट दृष्टांत सांगितले आहेत. पाण्यात शेवाळे उगवते ते पाण्यालाच झाकून टाकते, आकाशात ढग येतात ते आकाशच झाकून टाकतात. स्वप्नात आपलाच आपल्याला विसर पडतो.भगवंत म्हणतात माझ्यातूनच जन्माला आलेली ही त्रिगुण माया माझ्याच आड येते. म्हणून माझीच भूते मला जाणू शकत नाहीत. मोती पाण्यानेच बनले असून पाण्यात विरत नाहीत, मातीचा घडा अग्निने भाजून काढला की मातीपासून वेगळा दिसतो. तसेच माझीच भूते (प्राणीमात्र) मला ओळखत नाहीत. कारण 'मी माझे' या अहंकाराने ते मायेत गुरफटले आहेत, प्रपंचात रमले आहेत.

पराप्रकृती अपरात (जडात, स्थूलात) अवतरल्यामुळे तिला स्वरुपाचा विसर पडलाय. आपले स्वरुप परमात्म तत्वच आहे पण त्रिगुणात्मक माया आपणास आपलेच स्वरुपदर्शन घडू देत नाही. तरी परामातमतत्व मात्र स्थूलासहच आहे (ज्ञानं विज्ञान सहितं समग्रम्!) हे विसरून चालणार नाही.

आपल्याला वाटले आपण स्वतंत्र, वेगळे आहोत तर तो भ्रम आहे ते खरे नाही. या विश्वातील प्रत्येक वस्तू, वनस्पती, प्राणी, माणसे हे सारे मण्यांसारखे एका अदृश्य सूत्राने गुंफलेले आहेत. तसेच आकाशातील ग्रह गुरुत्वाकर्षणाने बांधलेले आहेत. प्राणी, वनस्पती या आपल्यावर अवलंबून आहेत व आपण त्यांच्यावर ! माणसाचे जीवन तर दुसऱ्याशी निगडीत आहेच. व्यक्ती कुटुंबाशी, कुटुंब समाजाशी, समाज राष्ट्राशी व राष्ट्रे एकमेकांच्याशी संबंधित आहेत. भारत पाकिस्तानचे संबंध बिघडले तर सारी राष्ट्रे कान टवकारून उभी आहेत. सर्वांचे संबंध एकमेकांत गुंतलेले आहेत. म्हणूनच 'वसुधैव कुटुंबकम्' ही उक्ती अगदी सार्थ आहे म्हणून केवळ मी व माझा विचार करणे हे आपल्याच पायावर कुऱ्हाड मारण्यासारखे आहे. **सर्वेपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयः। सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःख माप्नुयात॥** ही प्रार्थना यथायोग्यच आहे.

प्रपंचाला विज्ञान म्हणतात व तो सत्य समजणे हे अज्ञान. या प्रपंचावर ज्ञानेश्वरांनी माया नदीचे रुपक केले आहे. ते मूळातून पाहण्यासारखे आहे. ही ब्रह्मरुपी तुटलेल्या कड्यातून निर्माण झालीय, सृष्टी विस्तार रुपाने हिला पूर आलाय. प्रवृत्ती निवृत्तीच्या उंच काठावाहेरुन ही वाहतेय. गुणरुपी मेघांचा वर्षाव होतोय त्यामुळे ही मोहरुपी नदी महापुराने दुथडी भरून वाहतेय. यम-नियम रुपी गावे ही वाहून नेतेय. हिच्यात द्वेष, मत्सर, काम-क्रोध, लोभ मोह मद रुपी मोठे मासे आहेत. हिला प्रपंचाची अनेक वळणे आहेत. अहंकाराच्या मोठ्या लाटा सत्य लोकांच्या बुरुजावर जाऊन धडकत आहेत, हिचा पूर अजून ओसरलेला नाही. यातून तरुन जाण्यासाठी सद्गुरु चरणांचाच आश्रय करून मला शरण जाणे हाच एकमेव उपाय. विषय, अभिमान, मद यामुळे दमछाक होतेय. तरी त्यांना काही वाटत नाही. ते कोडगे झालेत. अगदी थोडेच परब्रह्मरुपी मुक्कामाला येऊन पोचतात. भगवंताचे परमानंदाने परिपूर्ण बोलणे ऐकून अर्जुन मंत्रमुग्ध झाला. शेवटी शेवटी सांगितलेल्या काही गोष्टी नीट न समजल्यामुळे त्याने नम्रपणे सात प्रश्न विचारले तोच आठव्याचा प्रारंभ आहे. भगवंताच्या बोलण्याची अर्जुनाला गोडी निर्माण झाली, त्यापुढे स्वर्गसुखही तुच्छ वाटू लागले. म्हणून भगवंताला नम्रपणे त्याने प्रश्न केले ते पुढील अध्यायात आपण बघणारच आहोत.

'परमात्म्याचे समग्र दर्शन' होण्यासाठी भक्तीचे नवे दालन या अध्यायात भगवंताने उघडलेले आहे. शिवाय ९ व्या अध्यायात अनन्य भक्तीचे महत्त्व सांगितले आहे. १२ वा अध्याय तर सगुण भक्तीचाच आहे. भक्तीबद्दल अनेकांनी आपली मते मांडली आहेत. चित्ताला श्रीकृष्णपरायण करणे त्याचे सतत चिंतन, भजन, मनन करणे ही भक्ती. सर्व श्रेष्ठता जाणून इतर सर्वांहून अधिक घट्ट असा स्नेह म्हणजे भक्ती आणि तिनेच मुक्ती मिळते. अन्य मार्गांनी नाही. असे वल्लभाचार्य या गीता भाष्यकाराने आपले मत मांडले आहे. मनुष्य केव्हा मरतो याबर त्याला मिळणारी गती अवलंबून नाही तर अध्यात्मिक जीवनात त्याने कोणती पायरी गाठली आहे यावर त्याची गती अवलंबून आहे. - गुरुदेव रानडे यांचे हे भाष्य आहे. कांट म्हणत, ो ईश्वर आपल्या हृदयातच आहे नव्हे आपणच ईश्वर आहोत. 'अहम ब्रह्मास्मि' प्रिय व्यक्तिसाठी आपण काहीही सोडतो. देवासाठी सर्व सोडून भक्तीभावाने त्याला शरण गेले पाहिजे, ज्ञानेश्वरांनी ९ व्या अध्यायात ४४५ ते ४५६ या ओव्यामधून भक्तीचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले आहे. भक्तीमुळे दैत्यांनाही देवत्व प्राप्त होते. सर्वसामान्य प्रत्येक हा भक्तीचा अधिकारी आहे. भक्तीभावाने शरण येणाऱ्याच्या योग्यायोग्यतेचा विचार न करता प्रभु कृपा करतात. ईश्वराविषयी भक्ती असणे महत्त्वाचे जाती, कुळ, वर्ण या गोष्टी गौण आहेत. ते म्हणतात -

**येर्‍हवीं दैत्याकुळ साचोकारें। परि इंद्रु ही सरि न लाहे उपरें।**
**म्हणौनि भक्ति गा येथ सरे। जाति अप्रमाण ॥ ४५२**

**पाहे पां भक्तिचेनि आथिले पणें। दैत्यें देवा आणिलें उणें।**
**माझें नृसिंहत्व लेणें। जयाचिये महिमे ॥ ४५०**

ज्ञानेश्वरांनी निर्माण केलेल्या वारकरी संप्रदायात सेना न्हावी, गोरा कुंभार, सावता माळी, चोखा महार, नामदेव शिंपी होता. भक्तीमार्गात कोणी लहान मोठा नाही. सर्व एकमेकांच्या पाया पडतात. त्यांनी ज्ञानाबरोबर भक्ती व स्वधर्माचरणाचा पुरस्कार केला. स्वधर्माचरण फलाशा सोडून करणे हाच नित्य यज्ञ. प्राप्त कर्तव्य पालन हाच यज्ञ हा विचार म्हणजे माझ्या सासुबाई कै. लक्ष्मीबाई भिडे. त्यांना तरुणपणीच वैधव्य आलं. तीन मुलांचं पालन पोषण, शिक्षण करण्यासाठी नोकरी करणं त्यांना भाग पडलं. मुलाबरोबर त्या मॅट्रीक उत्तम तऱ्हेने पास झाल्या. आणखी शिकायची त्यांना इच्छा होती. गीता, ज्ञानेश्वरी वाचायची आवड होती पण सवड नव्हती त्या म्हणायच्या प्राप्त परिस्थितीत चरितार्थ चालवणं, कर्तव्य कर्म करण हीच आता माझी गीता, हीच माझी ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे त्यांना केलेला हा कर्तव्य पालनाचा महान यज्ञच नव्हता का ?

**जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत।**
**हा भक्तीयोगु निश्चित। जाण माझा ॥**

भक्तीची अन्वय स्वरुप व्याख्या ज्ञानेश्वरांनी केली आहे ती समाजाभिमुख आहे.

व्यक्तीगत मोक्षविचार स्वार्थीपणाचा आहे. लो. टिळकांनी कर्मयोगाचा पुरस्कार करून निरपेक्ष भावनेने देशसेवेसाठी पुढे येण्याचे आवाहन तरुणांना केले. त्यांच्या आधी कर्मयोगाचा पुरस्कार आनंदवर्धनाने केला 'कर्मयोग हा ज्ञानापर्यंत जाण्याचा मार्ग आहे ते एक केवळ अपूर्ण आहे. ज्ञानप्राप्तीनंतर कर्म संन्यास हाच केवळ एकमात्र मार्ग आहे. कर्मसंन्यासामुळेच मोक्ष प्राप्ती होते,' हे शंकराचार्यांचे तत्वज्ञान. त्यावर आनंदवर्धनाने स्पष्ट शब्दात प्रतिवाद केला. 'श्रुतीने म्हटल्याप्रमाणे कर्तव्य कर्म न करणारा ज्ञानी हा नरकाचाच धनी. ज्ञानोत्तर कर्म न करणे हे फार भयावह आहे. म्हणून त्याची शिक्षा भोगावी लागते. ज्ञानपूर्वक कर्माचा, ज्ञानोत्तर कर्माचा श्रुती पुरस्कार करते. ज्ञानविरहित कर्म व कर्म विरहीत ज्ञान हे श्रुतीने निंद्य ठरवले आहे. कर्म दुय्यम नाही तर ज्ञानकर्म एकरुप आहेत. या मताचाच लो. टिळकांनीही पुरस्कार केला, पुनरुच्चार केला. 'ज्ञानाविना कर्म आंधळं आहे आणि कर्माविना ज्ञान पांगळं.

ज्ञान व कर्म या दोन पंखांनी माणसाला उडायला शिकायचं आहे. कोणत्याही एका पंखाने उडताच येणार नाही. गीतेचा ही हाच उपदेश आहे. विवेकानंदानीही रामकृष्ण मिशनची स्थापना करून ज्ञानोत्तर कर्माचा पुरस्कार करून समाजसेवेची बांधिलकी सर्व संन्यासांना बंधनकारक केली.

ज्ञानी भक्त हा सर्वश्रेष्ठ. त्यास मी अत्यंत प्रिय असतो व मला तो. ज्ञानी हा भक्त असायलाच हवा. आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी या भक्तीच्या तीन पायऱ्या चढून हा ज्ञानी झालेला असतो, 'वसुदेवः सर्वत्र' या भावनेशी तादात्म्य पावून तो एकत्वाचा अखंड आनंद घेत असतो. किडा मुंगी पासून तो चंद्र सूर्यापर्यंत सर्वत्र त्याला परमात्मा दिसतो. परमेश्वराची भक्ती ही अपूर्व साधना आहे. सकाम भक्तीचेही तो परमेश्वर कौतुकच करील. पुढे तीच भक्ती निष्काम होऊन पूर्णतेकडे जाईल. आपले प्राप्त कर्तव्य भक्ती भावाने म्हणजेच प्रेमाने, मनापासून केले की ते परमेश्वराला पावते. जो सर्वत्र मला पाहतो व आपले कर्तव्य पालन करतो तेही निष्कामपणे तो 'योग युक्तात्मा' भगवंताला प्रिय होतो. एकात्मतेचा अनुभव हेच परमात्माचे समग्र दर्शन.

जरा व मृत्यू यापासून मुक्ती मिळवण्यासाठी 'अर्थार्थी' या तिसऱ्या पायरीवरचे भक्त माझ्या आश्रयाने प्रयत्न करतात, त्यांना 'ज्ञानी' होण्यासाठी ते परब्रह्म, अध्यात्म, अधिदैवतासह आणि अधियज्ञासह मला जाणवतात. ते युक्तचित्त असल्यामुळे त्यांना देह वियोगाचे दुःख जाणवत नाही कारण ते मद्रूप झालेले असतात, भगवंताचे हे शेवटचे विवेचन अर्जुनासही समजलेले नाही व आपल्यालाही. तेव्हा अर्जुनाबरोबर आपणही ते पुढच्या अध्यायात समजून घेवूया, भगवंताकडून.

**श्रीमती आशा भिडे**

बी/९ विजय अपार्टमेंटस्, 'आराधना' टॉकीज जवळ ठाणे (पश्चिम) ४०० ६०२. दूरध्वनी : ५४१०१४०

***

## श्रध्दांजली



कविवर्य वसंत बापट यांचे १७ सप्टेंबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. महाविद्यालय परिसरात 'साहित्य सहकार' च्या एका कार्यक्रमासाठी दि. २० सप्टेंबर ७३ रोजी ते आले होते. कै. बापटांच्या समर गीतांनी आणि गगन सदन सारख्या प्रार्थनांसाठी मराठी साहित्यात घातलेली भर महत्त्वाची आहे.

कै. बापट यांना दिशाची विनम्र श्रध्दांजली.

## दिशा

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

संपादक

# भारतातील पाच आचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान

या लेखाद्वारे आपल्या पाच प्रमुख संप्रदायांचे आचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान काय होते याची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. - संपादक

भारतीय तत्त्वज्ञानात वेद, उपनिषदे, श्रीमद्‌भगवतगीता यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. म्हणूनच ह्या तिन्ही ग्रंथांना ''प्रस्थान त्रयी'' असे म्हणतात. ह्या ग्रंथांना प्रमाण मानूनच विविध मते, विविध आचार्यांची भाष्ये तयार झाली. त्यातूनच मग वेगवेगळे तत्त्वज्ञान/ संप्रदाय तयार झाले.

हे आचार्य व तत्त्वज्ञान खालील प्रमाणे आहेत.
१) श्री शंकराचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान याला ''अद्वैत तत्त्वज्ञान'' असे म्हणतात.
२) श्री रामानुजाचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान याला ''विशिष्टाद्वैत'' तत्त्वज्ञान असे म्हणतात.
३) श्री निंबार्क व त्यांचे तत्त्वज्ञान याला ''द्वैता द्वैत तत्त्वज्ञान'' असे म्हणतात.
४) श्री मध्वाचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान याला ''द्वैत तत्त्वज्ञान'' असे म्हणतात.
५) श्री वल्लभाचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान याला ''शुद्धाद्वैत'' तत्त्वज्ञान असे म्हणतात.

या सर्व आचार्यांनी वेद, ब्रह्मसूत्र, उपनिषदे यांना प्रमाण मानूनच आपापल्या तत्त्वज्ञानाची आखणी व मांडणी केली. सर्व आचार्यांनी आपले तत्त्वज्ञान मांडताना प्रमाण, प्रमेय, साधना व मोक्ष असे चार भाग केले व आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार सर्वत्र केला. या सर्व आचार्यांनी ब्रह्मसूत्र, उपनिषदे व श्रीमद्‌भगवद्‌गीता ह्यावर भाष्ये लिहिली आहेत.

आपण पहिल्यांदा श्री शंकराचार्य व अद्वैत तत्त्वज्ञान याचा विचार करू या.

१) शंकराचार्य यांचा जन्म ७८८ A.D. रोजी केरळ राज्यातील 'कलाडी' या छोट्या गावात एका नंबुद्री विद्वान दांपत्याच्या घरी झाला. त्या काळाप्रमाणे श्री शंकराचार्यांना गुरुगृही पाठविण्यात आले. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच संन्यास घेण्याचे ठरविले. ते आठव्या वर्षातच सर्व शास्त्रात पारंगत झाले. त्यांनी त्यांच्या ३२ वर्षांच्या आयुष्यात 'अद्वैत तत्त्वज्ञानाची नाव तर रचलीच पण त्यांचे तत्त्वज्ञान सर्वत्र माहिती होण्यासाठी श्री शंकराचार्य भारतभर हिंडले, अनेक पंडितांशी चर्चा केली. त्यांनी विविध ठिकाणी मठ स्थापन केले. त्यातील प्रमुख मठ असे आहेत. १) श्रृंगेरी २) पुरी ३) द्वारका ४) बद्रीनाथ हे होत. अनेक शिष्य तयार केले. त्यांनी ब्रह्मसूत्र, उपनिषदे, विष्णुसहस्त्रनाम ह्यांवर भाष्ये लिहिली, त्याचबरोबर अनेक स्तोत्रे रचली, अनेक ग्रंथ रचले व वयाच्या ३२ व्या वर्षी म्हणजेच ८२० A.D.मध्ये आपला देह ठेवला. त्यांचे तत्त्वज्ञान एकाच ओळीत सांगायचे तर असे आहे 'ब्रह्म सत्यं जगत् मिथ्या, जिवो ब्रह्मैव नापर.' म्हणजेच ब्रह्म हे पूर्ण सत्य आहे, ब्रह्म हे एकच आहे व त्या पूर्ण ब्रह्मातूनच विविध मनुष्याची रुपे दिसतात. जग हे असत्य आहे आणि मनुष्यांचा आत्मा म्हणजेच ब्रह्म होय. श्री शंकराचार्यांनी व्यावहारिक सत्य व पारमार्थिक सत्य हे तत्त्वज्ञानाचे दोन भाग केले. आपण जे या जगात रहातो, वावरतो आपल्याला जे अनुभव येतात. चांगले अथवा वाईट ते या व्यावहारिक जगापुरतेच सत्य आहेत पण आत्मा हा ब्रह्मच असल्यामुळे त्यावर या चांगल्या-वाईट व सुखःदुःखादी अनुभवांचा काहीच परिणाम होत नाही त्यामुळे पारिमार्थिक सत्य म्हणजे ब्रह्म व आत्मा एकच आहे हे जाणणे होय. बाकी सर्व आभास,

माया आहे. ब्रह्म/ब्रह्मन व आत्मा एक आहे हे जाणणे म्हणजेच मोक्ष. त्यांचे एकत्त्व म्हणजेच अद्वैत होय.

**२) दुसरे आचार्य श्री रामानुजाचार्य** - यांचा जन्म १०१७ साली असुरी केशव दीक्षित आणि त्यांची पत्नी कांतीमती केशव दीक्षित यांच्या पोटी झाला. असुरी दीक्षित हे विद्वान ब्राह्मण होते. ते श्री पेरूम्बदुर येथे राहात होते जे मद्रास पासून ३० मैल दक्षिण-पश्चिमेस आहे. तथेच श्री रामानुजांचा जन्म झाला. वडिल असुरी केशव दीक्षितांनीच त्यांना संस्कृत व वेदांचे अध्ययन शिकविले व वयाच्या १६ व्या वर्षी श्री रामानुजांचे लग्न लावून दिले. पण लग्नानंतर एका महिन्यानंतर वडिलांचे निधन झाल्यावर श्री रामानुजाचार्य आपल्या परिवारासह जवळच्याच 'कांचिपुरम' खेड्यात राहण्यास गेले. तेथेच त्यांनी पुढील वेदांताचा अभ्यास करण्यासाठी अद्वैत मत प्रणाली जाणून घेतली जी सर्वत्र माहिती होती पण थोड्याच काळात गुरु-शिष्यांमधील अंतर वाढत गेले व श्रीरामानुजांनी दुसरे गुरु केले त्यांचे नाव होते 'यमुनाचार्य' ते वैष्णव संप्रदायाचे प्रवर्तक होते. त्यांनी श्री रामानुजांना 'श्री वैष्णव' संप्रदायाचा प्रसार करण्यास सांगितले. श्री रामानुजांनी श्री यमुनाचार्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण करण्याची शपथ घेतली व त्यांनी ब्रह्मसूत्रावर भाष्य लिहिले त्यालाच 'श्री भाष्य' असेही म्हणतात. त्यातूनच त्यांनी विशिष्ट अद्वैताचे तत्त्वज्ञान मांडले. श्री रामानुजांनी वेदांत संग्रह हा उपनिषदांवरील ग्रंथ लिहिला, गीता-भाष्य लिहिले; वेदांत सार व वेदांत दिपीका असे ग्रंथ लिहिले.' त्यांनी अनेक शिष्य तयार केले. पुरी, ब्रद्रिकाश्रम, काश्मिर भागात हिंडले व आपल्या वैष्णव/विशिष्ट अद्वैत मतांचा प्रसार केला. त्यांच्या शिष्यांना 'अलवार' असे म्हणतात. त्यांचे ग्रंथ संस्कृत व तामिळ भाषेत असल्यामुळे कांची, श्रीरंगम येथेच त्यांचा प्रभाव जास्त आहे. त्यांचे कार्य १२० वर्षापर्यंत चालू होते. १०१७ ते ११३७ इ. स. त्यांचे तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मन, जीव व प्रकृति ही तीन तत्त्वे आहेत. ब्रह्मन हे पूर्ण व स्वतंत्र आहे व जीव व प्रकृति हे ब्रह्मन वर अवलंबून आहेत व ब्रह्मनचेच भाग आहेत. जीव अनेक आहेत ब्रह्मन व जीवामध्ये भेद व सारखेपणा ही आहे. ब्रह्मन व जीवाचे ऐक्य होत नाही, पण जीव ईश्वराला 'प्रपत्ति भक्तीद्वारे' जाणू शकतो. ईश्वर, भगवान, ब्रह्मन या विविध नावांनी जीव भगवंताला जाणू शकतो पण जीवाला भगवंताची प्राप्ती प्रपत्ति भक्ती द्वारेच होऊ शकते. श्री शंकराचार्यांचे ब्रह्मन व जीव एकच होतात हे त्यांना मान्य नव्हते. म्हणूनच त्यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाला विशिष्ट अद्वैत असे नाव दिले.

**३) तिसरे आचार्य श्री निंबार्क** - यांच्या तत्त्वज्ञानाला द्वैता द्वैत असे म्हणतात. त्यांच्या मृत्यूची नोंद ११६२ आहे. जन्मवर्ष नक्की माहीत नाही. श्री जगन्नाथ आणि सरस्वती या तामिळ दांपत्यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. त्यांचे निंबार्क हे नाव, त्यांच्या जन्म स्थळावरून पडले असावे. त्यांचे जन्मस्थळ निंबापूर हे नायडूपट्टनाच्या जवळ (जे बेल्लारी जिल्ह्यात येत) तेथे झाला म्हणून निंबार्क. पण त्यांचे खरे नाव होते 'नियमानंद' त्यांनीही ब्रह्मसूत्रावर छोटेसेच भाष्य लिहिले, श्रीमद्भगवद्गीतेवरही लिहिले.

त्यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाला द्वैता द्वैत असे नाव दिले. ब्रह्मन हे अंतिम सत्य आहे. जीव व प्रकृति ब्रह्मन पेक्षा वेगळे आहेत. ब्रह्मनच जगाचे अपादान व उपादान कारण आहे. मुक्तीमध्ये सुद्धा जीव ईश्वरामध्ये विलिन होत नाही तर जीवाला ईश्वराचे संपूर्ण ज्ञान होते. थोडे ईश्वराचे सान्निध्य प्राप्त होते.

**४) चौथे आचार्य श्री मध्वाचार्य** - यांच्या तत्त्वज्ञानाला 'द्वैत तत्त्वज्ञान' असे म्हणतात. त्यांचा जन्म १२३८ साली प्राजक क्षेत्र या खेड्यात झाला. हे उडुपी पासून ८ मैल आहे. त्यांच्या वडिलांचे नाव 'मध्यगेह भट्ट' असे होते. त्यांनी मध्वाचार्यांना लहानपणीच इतिहास व पुराणे यांचे शिक्षण दिले. श्री मध्वाचार्य यांचे लहानपणीचे नाव वासुदेव होते. वडिलांनी वासुदेवाला 'अच्युतप्रेक्ष' या गुरुंजवळ

पाठविले. अच्युतप्रेक्षांनी त्यांना सन्यासाची दीक्षा दिली व त्यांचे नाव 'आनंदतीर्थ' असे ठेवले. गुरुही त्यांनी वेद, पुराणे, ब्रह्मसूत्र, शंकराचार्यांचे इष्ट सिद्धी हे ग्रंथ वाचले, अभ्यास केला. त्यांना श्रीशंकराचार्य व श्री रामानुजाचार्यांच्या तत्त्वज्ञानात काही भिन्नता दिसली म्हणून श्री मध्वाचार्यांनी द्वैत तत्त्वज्ञानाची स्थापना केली. श्री आनंदतीर्थ हे मध्वाचार्य या नावानेच सर्वत्र ओळखले जातात. वासुदेव, आनंदतीर्थ, पूर्णप्रज्ञ व मध्व ही सर्व त्यांचीच नावे आहेत हे त्यांच्या चरित्रकार श्री नारायण पंडित यांनीच श्रीमद्वविजय ग्रंथात लिहून ठेवले आहे.

श्री मध्वाचार्य सर्व भारतभर हिंडले. अद्वैत मताचे खंडन केले, शिष्य तयार केले. त्यांनी आठ मठ स्थापन केले. १) श्री व्यासराय मठ २) श्री राघवेंद्र मठ ३) श्री श्रीपादराय मठ ४) श्री अक्षोभ्य तीर्थ मठ ५) श्री गोकर्ण मठ ६) श्री श्रीकृष्ण मठ ७) श्री काशी मठ ८) श्री उत्तरादी मठ हे होत. त्यांनी एकूण ३७ ग्रंथांची रचना केली. त्यात ब्रह्मसूत्र, गीता, उपनिषदे महाभारत यावर भाष्ये तर आहेतच पण त्यांनी अद्वैत मताचे खंडन करण्यासाठी 'दश प्रकरण' हा मोठा ग्रंथ लिहिला व त्यात त्यांनी उपाधि, मायावाद, मिथ्यत्व याचेच खंडन केले आहे. 'अणु-व्याख्यान' हे ब्रह्मसूत्रावरील त्यांचे भाष्य म्हणजे तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. ते वयाच्या ७९ व्या वर्षीपर्यंत कार्य करत होते. त्यांचा जन्म व काल १२३८ ते १३१७ हा होय. त्यांचे तत्त्वज्ञान - श्री मध्वाचार्यांच्या तत्त्वज्ञानाला द्वैत सिद्धांत अथवा तत्त्ववाद असेही म्हणतात. पण द्वैत सिद्धांत हेच नाव जास्त प्रचलित आहे. द्वैत म्हणजे ब्रह्म व जीव कधीही एक होत नाहीत. जीव व प्रकृति हे नेहमीच भगवंतावर अवलंबून असतात. जग हे सत्यच आहे. तत्त्वज्ञानात व्यावहारिक व पारमार्थिक असे दोन निकष नसतात जे जगात आहे व जे अनुभवायचे आहे ते पूर्ण सत्यच आहे.

त्यांचे तत्त्वज्ञान पाच भेद प्रामुख्याने मांडतात.

१) एक जीव व दुसरा जीव भेद

२) ईश्वर व जीवामध्ये भेद

३) ईश्वर व जड वस्तूत भेद

४) जीव व जड वस्तूभेद

५) जड वस्तू व जड वस्तूत भेद.

हे भेद कायम राहतात व ते त्यांचे मूलतःच भेद असतात, ते कधीही मिटत नाहीत. त्यांचे तत्त्वज्ञान खालील ओळीत मांडता येते - "श्रीमनमद्ध हरिःपरतरः सत्यं जगत तत्वतः भिन्नः जीवगणः हरेरनुचर, निचोच्च भावंगतः 'मुक्तिनिज सुखानिभूति अमला भक्तिश्च तत् साधनम् अक्षादि तृतीय प्रमाणं अखिलामाएकं हरीः" थोडक्यात श्री विष्णु सर्वोत्तम त्याने निर्माण केलेले जग हे सत्यच आहे. सर्व जीव श्री विष्णु वरच मुक्तिसाठी अवलंबून आहेत व त्याचे दास आहेत. प्रत्येक जीव हा भिन्नच आहे व राहणार मुक्ती म्हणजे स्वतःचा आनंद जो विष्णुच्या भक्तीनेच मिळतो व या सर्वांना वेद प्रमाण्य आहे. श्री मध्वाचार्य ईश्वर व जीवात कायम भेद मानतात व मुक्ती फक्त भक्तीनेच मिळते असे सांगतात.

५) **पाचवे आचार्य श्री वल्लभाचार्य** - यांच्या तत्त्वज्ञानाला सुद्धा द्वैत असे म्हणतात. त्यांचा जन्म १४७९ साली काकरवड येथे कृष्णा नदीच्या काठी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव 'लक्ष्मण भट्ट' व आईचे नाव 'येल्लम्मा गारु' होते. श्रीवल्लभ वयाच्या सातव्या वर्षी विष्णुचित्त यांच्याकडे वेद पंचरात्र, भागवद्, उपनिषदे शिकले. त्यासाठी ते बनारस येथे राहिले. ते ही सर्व आचार्यांप्रमाणे आपल्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी भारतभर हिंडले. त्यांनी ब्रह्मसूत्र ३-२-३३ पर्यंतच भाष्य लिहिले बाकी ब्रह्मसूत्र भाष्य

(पान क्र. ४० पहा)

# मोडी लिपीच्या संदर्भात

## सौ. सुनीता गणुपले यांची मुलाखत

*मोडी लिपीचा व्यवहारातील वापर आज संपला आहे. मात्र या लिपीचे ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व मात्र मोठे आहे. या संदर्भात कार्य केलेल्या सौ. गणपुले यांची मुलाखत त्या दृष्टीने घेतली आहे. - संपादक*



सौ. सुनीता गणुपले

**१) ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असताना मोडी लिपीच्या अभ्यासाकडे आपण कशा वळलात ?**

.... हो मी अनेक ग्रंथालयातून काम केले आणि घरी देखील लायब्ररी सुरु करून काही वर्ष घरपोच सेवा दिली, परंतु घरच्या जबाबदाऱ्या आणि यजमानांची पुण्याला बदली यामुळे नोकऱ्या सोडाव्या लागल्या. तरी मला मुळातच अभ्यासाची खूप आवड. त्यामुळे मिळालेल्या वेळात अभ्यास करून मी M. A. B.Lib पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुण्याला बदली झाल्यावर फावल्या वेळात Research Center साठी Women Achivers नावाचा प्रकल्प तर भारतीय इतिहास संकलन समितीसाठी स्त्री जीवन स्थित्यंतर या विषयांतर्गत दोन प्रोजेक्टस् मी विना वेतन केले.

१) स्त्रिया आणि स्त्री नियतकालिके, आणि २) स्त्रिया आणि ग्रंथालये. सांगायचा हेतू एवढाच की मला अभ्यासाची खूप आवड आहे.

तर पुण्यात ५ वर्षे राहिल्या नंतर आम्ही पुन्हा मुंबईला आलो. त्यावेळी लोकसत्ता मध्ये ''तंजावरचे राजे'' नावाचा मोडी लिपीच्या संदर्भात एक लेख छापून आला होता. आम्हाला १ ते ७ वी मोडी अभ्यासक्रमात होती त्यामुळे आठवणी ताज्या झाल्या , थोडी उत्सुकता निर्माण झाली आणि त्यानंतर लगेचच श्री. ग. का. रायकरांनी मोडी लिपीचे अभ्यासवर्ग सुरु केले आणि मी त्यांच्या पहिल्याच वर्गात प्रवेश घेतला. त्या नंतर जवळ जवळ वर्षभर मी घरीच मोडीचा अभ्यास केला. त्यासाठी अनेक पुराभिलेख, साधने व ग्रंथ अभ्यासले आणि १९९२ पासून स्वत: अध्ययन वर्ग सुरु केले ते जवळ जवळ १९९४ पर्यंत चालविले.

**२) मोडी लिपीचे लिपी म्हणून असणारे महत्त्व काय?**

मोडीचा उगम हा देवनागरीतच आहे. किंवा असे म्हणता येईल की मोडी ही देवनागरीची जलद लिपी किंवा शीघ्र लिपी आहे. या मधील अक्षरे हात फारसा न उचलता काढली जातात. तसेच दोन शब्द देखील एकमेकांना चिकटून काढले जातात. शब्दांवरील शिरोरेघ ही ओळीतील सर्व शब्दांना मिळून एकच असते. त्यामुळे लिहितांना वेळ वाचतो.

मोडी लिपी प्रामुख्याने महाराष्ट्रातील असली तरी मराठी राजा जेथे जेथे गेला तेथे तेथे त्याने जलद कारभारासाठी मोडीचा पुरस्कार किंवा वापर केला. पण त्यामुळे मोडीवर गुजराथी, उर्दू, तामिळ अशा इतर प्रांतीय भाषांचाही प्रभाव आढळतो. त्यामुळे प्रत्येक प्रांताचे पुराभिलेख थोडेफार वेगळे दिसतात. मोडी लिपीच्या इतिहासात या लिपीची सुरुवात कधी झाली याबद्दल मात्र एकमत नाही.

शिवकालात चिटणीस, बाळोजी आवजे यांनी तयार केली असावी असा समज होता, परंतु आता तो अमान्य झाला आहे कारण त्यांच्या पूर्वीची मोडीतील कागदपत्रेही उपलब्ध आहेत. श्री. वि. का. राजवाडे व श्री. ल. श्री. वाकणकर आदींच्या मते अशोकाच्या काळात प्रचलित असलेल्या लिपीची ही सुधारित आवृत्ती असावी. तसेच सुमारे ७०० वर्षापूर्वी यादव काळात जे हेमाडपंडित होते त्यांनी देवनागरीच्या लिखाणाचा वेग वाढविण्यासाठी लिखाणाच्या क्रियेमध्ये काही बदल करण्याचा प्रयत्न केला त्यावेळी मोडीची निर्मिती झाली असावी असे म्हटले जाते.

**३) मोडी लिपीचे आजच्या संदर्भात काय महत्त्व सांगता येईल ?**

मराठ्यांच्या इतिहासाच्या संदर्भात अनेक साधने व दफ्तरी कागदपत्रे यांची संख्या जवळ जवळ ५ ते ७ कोटी इतकी आहे आणि इतिहास संशोधनात या अस्सल साधनांचा उपयोग करण्यासाठी मोडी लिपीच्या अभ्यासाची अत्यंत आवश्यकता आहे. कारण संशोधनासाठी अशा अस्सल पुराव्यांचीच गरज असते. तसेच पूर्वीच्या काळी सामान्य जनमानसात देखील मोडी प्रचलित होती. त्यांचे दैनंदिन व्यवहार पत्रव्यवहार, जमाखर्च नोंदणी इ. मोडीतूनच होत. त्यामुळे त्यावेळची सामाजिक परिस्थिती जीवनक्रम कसा होता हे जाणून घ्यायचे असेल तरी मोडीचे ज्ञान आवश्यक ठरते.

तसेच आजही काही कुटुंबांची वारसा हक्काची कागदपत्रे मोडीत असल्याने व ती दुर्बोध राहिल्याने मालमत्तेचे वाटप होऊ शकत नाही तरी त्यासाठी देखील मोडीच्या जाणकारांचा उपयोग होऊ शकतो. आणखी एक मोडीचा उपयोग म्हणजे मोडी लिपीतील सही कोणालाही चोरता येत नाही.

**४) ही लिपी वापरातून कमी होत जाण्याची काय कारणे होती ?**

याचे महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्रजांचा अमंल आणि त्यानंतरचा इंग्रजीचा प्रभाव. खरेतर १९१५ पासून १९५१ पर्यंत प्राथमिक शाळा, कोर्ट दरबार, ट्रेनिंग कॉलेज, जमिन जुमल्याची कागदपत्रे इ. सर्व ठिकाणी मोडीचाच वापर होत असे परंतु १९५१ पासून खेर मंत्री मंडळाने ती अनावश्यक ठरवली आणि व्यवहारातून काढून टाकली. त्यामुळे साहजिकच ती वापरातून कमी होऊ लागली. इंग्रजीच्या प्रभावामुळे जरी मोडी अस्ताला गेली असली तरी विल्यम कॅरे आणि चार्ल्स विल्कॉन्स या इंग्रजांनीच मोडीचे पंच (टाईप) तयार केले आणि त्या आधारेच पंचांग, व्याकरणाची पुस्तके, कोश, वाङ्मय, भगवत गीता, हितोपदेश इ. ची अप्रतिम छपाई शक्य झाली. आजही हे टाईप इंडिया ऑफीस या इंग्लंड मधील ग्रंथालयात ३ पेटयांमधून उपलब्ध आहेत.

दुसरे एक कारण म्हणजे मोडी वाचताना अनेकदा अडथळे येतात. कारण शद्व सुटे नसतात बरेचदा अंदाजाने शद्बांचा अर्थ लावावा लागतो. उदा. खेर आणि खरे, तसेच -हस्व, दीर्घ भेद नाही, विराम चिन्हे नाहीत, एकच शिरोरेघ या सर्वांमुळे वाचन दुर्बोध होते आणि त्यामुळेही तिचा वापर कमी होत गेला असे म्हणता येईल.

**५) मोडी लिपी आता लोकप्रिय ठरण्याच्या दृष्टीने काय करता येईल ?**

नाही, मोडी आता लोकप्रिय होणे कठीण आहे. पण ज्यांना आवड आहे त्यांना छंद म्हणून जोपासता आणि त्याच्यासाठी मोडी अभ्यासवर्ग आजही सुरु आहेत. आणि आधुनिक काळात तिला व्यवहारिक महत्त्व नसले तरी सांस्कृतिक महत्त्व आहे. त्यामुळे मोडी लिपीतील जो संग्रह आहे तो जपला पाहिजे. तसेच मोडी लिपीची अक्षरे अत्यंत वळणदार किंवा काही काही तर नक्षीप्रमाणे आहेत. त्यांचा उपयोग करून चित्रे तयार करता येतील. मंहिरप किंवा वेलबुटी तयार करून फॅशन डिझाईन किंवा प्रिंटींगसाठी देखील त्याचा उपयोग करता येऊ शकेल.

**६) आपले या लिपीच्या अभ्यासाचे स्वरुप कसे होते ?**

मी मोडी लिपीचा आढावा घेणारे संशोधन केले. यासाठी मी अनेक पुराभिलेख साधने व ग्रंथांचा अभ्यास केला. उदा.१) मराठे कालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षर युक्त पत्रे - संपादक - दिक्षित-खोब्रेकर (१९६९)

या मध्ये ५४ ऐतिहासिक स्त्री पुरुषांनी लिहिलेली पत्रे आहेत.

२) शिवकालीन पत्रांचे प्रतिरुप दर्शन

संपादक-घाटावकर (१९८८)

यांनी सुमारे २०० पत्रे जमा केली त्यात फक्त २५ पत्रेच शिवकालीन होती आणि फक्त काहीच अस्सल होती (अस्सल म्हणजे ही पत्रे शिवाजीच्या दरबारातीलच आहेत यांच्या काही खुणा असत जसे अष्टकोनी मुद्रा शिक्का मोर्तब इ.)

१६७४ मध्ये राज्याभिषेक झाल्यानंतर मोरोपंतांनी ही लेखन प्रशस्ती सुरु केल्याचे यामध्ये समजते.

तर अशा प्रकारच्या साधनांचा मी अभ्यास केला. त्यानंतर मोडी अभ्यासवर्ग घेत असतानाच विद्यार्थ्यांना सरावासाठी मोडीपुस्ती (WorkBook) हे हस्तलिखित तयार केले. त्यावर डॉ. उषा देशमुख (पूर्वीच्या मराठी विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ) यांचा अभिप्राय देखील मिळाला. आणि खरं तर मोडी लिहिण्याचा माझा छंदच आहे. माझा चांगला विरंगुळा होतो त्यामध्ये. म्हणूनच मी सतत मोडी संदर्भात काहींना काही नवीन प्रयोग करत राहिले. जसे मोडी लिपीच्या प्रचारासाठी मोडी संदर्भात चांगल्या पुस्तकांचे परिचय, लेख लिहिले.

" मोडी अक्षर टिका परिज्ञान (१८८३)" या दुर्मिळ पुस्तकाची हस्तलिखित प्रत तयार केली.

तसेच मोडी लिपीच्या पोस्टल कोर्सची आखणी केली " पत्र मैत्री" उपक्रम सुरु केला.

तापसी शारदा संदर्भात कै. शांता शेळके यांना मोडीत पत्र पाठविले.

ऋतुचक्र - दुर्गा भागवत यांच्या लघुनिबंधाचा काव्यानुवाद मोडी लिपीत रंगीत स्वरुपात लिहून त्यांना अर्पण केला.

अजूनही मी मला वेळ मिळेल तेव्हा छंद म्हणून लिप्यंतरांची कामे करते. कोणाला माझ्या घरी येऊन शिकायाची तयारी असेल तर मी आवडीने शिकवेन.

मी काही फार मोठे कार्य किंवा Ph.D. वगैरे केलेली नाही. पण खूप हौसेने, आवडीने आणि जिद्दीने मोडीचा अभ्यास आणि अध्ययन केले. हे करताना अडचणी आल्या पण अनेकांनी सहकार्य ही केले. त्यांचा मला इथे आवर्जून करावासा वाटतो ते म्हणजे कै. श्री. ग. का. रायकर. एक कार्य तपस्वी व्यक्ती यांच्यामुळेच मी मोडी लिपीशी नाते जोडले आणि या अनुभवी ज्येष्ट सुष्ट व शांत स्वभावी व्यक्तिमत्वाने मला वेळोवेळी सहकार्य केले.

या शिवाय सौ. ओक, आणि श्री. वेलणकर माझ्या मोडी कार्यास मनापासून हातभार लावणाऱ्या प्रा. सौ. विद्या राऊत, उपयुक्त ग्रंथ पुरवणारे व प्रोत्साहन देणारे डॉ. चि. ना. परचुरे तसेच माझा विद्यार्थी वर्ग यांची ही मी कृतज्ञ आहे.

अंती मोडी कार्यात माझे हात येणाऱ्या अडचणी झेलण्यास सदैव तयार राहिले. मात्र स्वप्नातील 'तंजावर' दूर राहिले असे म्हणावे लागते.

**वाचकांसाठी सौ. सुनीता गणपुले यांचा पत्ता :**

साईश अपार्टमेंट, शुश्रुषा हॉस्पिटल जवळ,
कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई ४०० ०७९.
दूरध्वनी : ५७९ १६ ८७

मुलाखत लेखन

**सौ. दीपाली हिंदळेकर**

डोंबिवली.

# शिक्षक दिना निमित्ताने

*आमच्या संस्थेच्या ए. के. जोशी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी शिक्षकदिनी केलेले भाषण. - संपादक*

विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. करंदीकर सर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, इतर पदाधिकारी व इतर सर्व मान्यवर.

आज ५ सप्टेंबर शिक्षक दिन! वर्षानुवर्षे आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. ५ सप्टेंबरच्या आधी व नंतर ४-५ दिवस अनेक ठिकाणी वेगवेगळ्या स्तरातील शिक्षकांचा गौरव केला जातो. शिक्षकांच्या कार्याचा गौरव त्यांना विविध पातळीवर पारितोषिके देऊन केला जातो. शिक्षकी पेशाला या सर्वांमुळे सर्वत्र मान्यता, सन्मान दिला जातो. आपलं विद्या प्रसारक मंडळ ही त्याला अपवाद नाही. दरवर्षी ५ सप्टेंबर या दिवशी आपल्या शिक्षकांचा सन्मान करून एक अतिशय चांगला कार्यक्रम मंडळ आयोजित करतं त्याबद्दल मी मंडळाची ऋणी आहे. मंडळाने आयोजित केलल्या अनेक कार्यक्रमांतून आमच्यावर चांगले संस्कार नेहमीच घडत असतात.

माझ्या समोरील सर्व मान्यवर माझ्या पेक्षा वयाने, अनुभवाने, ज्ञानाने श्रेष्ठ व ज्येष्ठ! त्यांच्यासमोर बोलण म्हणजे खूप संकोच वाटत आहे तरी सुद्धा माझे दोन शब्द!

शिक्षक दिनाचे सत्कार सोहळे संपले की परत शाळेच रुटीन सुरू होत. वर्षभर त्या दिवशी ऐकलेले मोठे मोठे शब्द, वाक्य शिक्षक नव्या पिढीला घडवत असतो, तो त्यांचा आदर्श असतो, इत्यादी विस्मरणात जातात पुढचा शिक्षक दिन येईपर्यंत!

आपला सर्वांचा पेशा-शिकवणं! परंतु काही वेळा असही असत की कुठेही नोकरी मिळत नाही मग बी. एड्, डी. एड् करून शाळेत नोकरी मिळाली कि सुटलो! खरंच आपल्याला या पेशाची आवड आहे का असा विचार किती जण करतात? आजच्या शिक्षकांच्या समोर अनेक विकट समस्या आहेत व मुख्य सतावणारी समस्या म्हणजे वर्गात असणारी भली मोठी संख्या! तरीसुद्धा मला प्रामणिकपणे असं वाटत जर आपण आपलं शिकवण interesting करत गेलो तर अगदी शेवटच्या बेंचवर बसणारी मुलं सुद्धा नकळत रंगून जातात व कुठेतरी त्यांच्या कानावर पडणारे शब्द त्यांच्या मेंदूपर्यंत पोहचतात. बऱ्याच वेळा असे संवाद होतात - 'मागच्या बॅचेचमधुची मुले खूप चांगली होती, आजची मुल त्यांना काही आदर नाही, प्रेम नाही.' परंतु मला असं वाटत की शिक्षक व विद्यार्थी हे नातं जर चांगल्या पद्धतीने विकसित झालं तर विद्यार्थ्यांच्या मनात आदर प्रेम आलंच पाहिजे. रस्त्यातून जाताना शाळेतील खूप मस्तीखोर, त्रासदायक मुलगा जेव्हा शिक्षकाला बघून धावत येतो तेव्हा त्या शिक्षकाने खरंच काही मिळवलेलं असत! आजचा आपल्या समोरचा विद्यार्थी खरंच काही माहिती असणारा असतो. T.V. इतर media, Internet computer या सर्वांद्वारे ज्ञान मिळण्याचे अनेक मार्ग त्याला मोकळे असतात. त्यामुळे आपण आपल्या विषयाची, पाठाची पूर्ण तयारी करून पूर्ण तयारीनिशी वर्गात जाणं हे अत्यंत महत्त्वाचं असत. तयारी न करून जाणारा शिक्षक विद्यार्थी सहजच ओळखतात व

मग ते प्रेम, आदर, खूप दूर जाते. अनेक वर्ष आपण तेच तेच विषय शिकवितो मग दरवर्षी तयारी कसली करायची ? पण आपल्या समोरचा विद्यार्थी वर्ग दरवर्षी वेगळा असतो याचं भान शिक्षकांनी ठेवणं महत्वाचं आहे. तसेच प्रत्येक वर्षांची तयारी आपल्याला नवीन मुद्दे सुचवून जाते. गणित, इतिहास, भूगोल असे विद्यार्थ्यांना क्लिष्ट वाटणारे विषय आपण काळजीपूर्वक शिकवण्यास हवेत. ८०-८५% मार्क मिळविणारी मुले चांगलीच असतात पण आपलं शिकवणं हे average व below average मुलांसाठी असतं हे लक्षात घेणं गरजेच आहे. इतर jobs व आपलं कामाचं स्वरूप फार वेगळं आहे म्हणूनच आपलं व्यक्तिमत्त्व आपलं वागणं व इतर अनेक गोष्टींची काळजी घेणं जरूरीचे आहे कारण या अतिशय महत्त्वाच्या गोष्टी आहेत. म्हणूनच असं वाटतं की आज आपण अंर्तमुख होऊन आपल्या पेशाबद्दल आपण किती प्रामणिक आहोत याचा विचार करणं जरूरीचे आहे !

आपण सर्व उत्तम शिक्षक आहातच ! परंतु थोड्याशा अनुभवातून काहीसे मनातले विचार मी मांडण्याचा प्रयत्न केला एवढच ! थोर शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून माझे दोन शब्द संपवते, धन्यवाद !

सौ. कालिंदी कोल्हटर
मुख्याध्यापिका, आनंदीबाई
जोशी विद्यालय, नौपाडा, ठाणे.

***

## श्रध्दांजली



बापटां पाठोपाठ दुसऱ्या दिवशी १८ सप्टेंबर रोजी मृत्युंजय कादंबरी लिहिणारे प्रसिद्ध कादंबरीकार शिवाजी सावंत यांचे निधन झाले. कऱ्हाड येथे होणाऱ्या आगामी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडणूक रिंगणात असतानाच हा अकस्मित मृत्यु झाला.

कै. शिवाजी सावंत यांना दिशाची विनम्र श्रध्दांजली.

दिशा
आपल्या प्रतिक्रिया
अवश्य कळवा.

# पुस्तक परिचय

*प्राचार्य सी. श्री. मुजुमदारांचे पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले. त्याचा थोडक्यात परिचय येथे देत आहे. - संपादक*

विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार यांच्या 'युनिट ऑपरेशन्स' व 'युनिट प्रोसेस' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन या संस्थेने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचा हा परिचय.



**पुस्तकाचे प्रकाशन करताना त्यावेळी बोलताना वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर (मध्यभागी उभे), डावीकडून पुस्तकाचे लेखक प्राचार्य सी. श्री मुजुमदार, उजवीकडे मंडळाचे उपाध्यक्ष श्री. करंदीकर.**


आय. टी. आय, बेसिक ट्रेनिंग सेंटर तसेच केमिकल प्लान्ट मधील शिकाऊ उमेदवार यांना उपयुक्त ठरणारे व मुख्यतः मराठीतून असणारे असे हे पुस्तक आहे. तांत्रिक विषय मराठीतून लिहिणे हे अतिशय जिकिरीचे काम आहे. मूळ इंग्रजी पण तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना सरावाच्या असणाऱ्या संकल्पना तशाच ठेवून बाकीचा मजकूर मराठीत लिहिणे याला प्रचंड अनुभवाची गरज आहे. कोणते शब्द मूळ इंग्रजीत ठेवायचे कोणते भाषांतर करायचे याचे भान असणे महत्वाचे आहे. या क्षेत्रात विशेषतः आय. टी. आय शिकणारे उमेदवार हे कमी शिकलेले असतात. त्यांना तर हे पुस्तक फारच उपयोगी आहे.

पुस्तकाचे मुखपृष्ठ रेखीव फ्लोचार्ट ने सजवलेले आहे. या पुस्तकात युनिट ऑपरेशन्स मध्ये रासायनिक कारखान्यातील ऑपरेटरची भूमिका हे एक महत्वाचे प्रकरण समाविष्ट केल्याने या पुस्तकाची उपयुक्तता अधिक वाढली आहे.

युनिट ऑपरेशन्स व युनिट प्रोसेसेस असे दोन भाग या पुस्तकात आहेत. युनिट ऑपरेशन्स मध्ये युनिट ऑपरेशन याशिवाय बाष्पीभवन, द्रव व वायूचे वहन, सॉलव्हन्ट एक्सट्रॅक्शन, डिस्टीलेशन, सुकविणे, स्फटिकीकरण, ग्रायडिंग, चाळणे, गाळणे, मिक्सिंग, घन पदार्थांचे वहन ही प्रकरणे समाविष्ट आहेत.

तसेच युनिट प्रोसेसेस मध्ये रासायनिक कारखान्यातील महत्त्वाच्या रासायनिक क्रिया व युनिट ऑपरेशन्सचे संश्लेषण, रासायनिक क्रियांचे भौतिक आणि रासायनिक तत्त्व, सल्फुरिक ॲसिड, अमोनिया व युरिया साखर व इथाईल अल्कोहोल, नायट्रिक ॲसिड, पाणी, नैसर्गिक उत्पादनावर आधारित उद्योग, लोखंड व पोलाद, सिमेंट, पेट्रोलियम आणि पेट्रोलियमजन्य पदार्थ असे अनेक विषय यात समाविष्ट आहेत.

साखर व इथाईल अल्कोहोल या प्रकरणात 'इथाईल अल्कोहोल वाय फरमेन्टेशन' यावर उत्तमरित्या समजेल असा फ्लोचार्ट लेखकाने दिला आहे. त्याचे उदाहरण म्हणून इथे देत आहे.




इथाईल अल्कोहोल वाय फरमेन्टेशन

रासायनिक कारखान्यातील महत्त्वाच्या रासायनिक क्रिया व युनिट ऑपरेशन्सचे संश्लेषण या प्रकरणात तर ओपन पॅन मल्टीपल इफेक्ट इव्हापोरेटर, एक्सट्रॅक्टर, सेंट्रिफ्युगल पंप, जेट इजेक्टर, फिक्स्ड बेड रिॲक्टर, फ्लुईडाईज्ड बेड या सर्वांच्या आकृत्या स्पष्ट आणि सुरेखरित्या दिल्या आहेत. या आकृत्यांमुळे माहिती चांगल्या प्रकारे मिळते. उत्तम आकृत्या व स्पष्ट फ्लोचार्ट यामुळे विषयातील क्लिष्टपणा कमी होऊन विषय सोपा होऊन जातो.


## बाष्पीभवन

१) ओपन पॅन




छोट्या प्रमाणात बाष्पीभवनासाठी वापरात आणतात. व्हिस्कस मटेरिअलचे बाष्पीभवन करण्यासाठी वापरले जाते. याची स्वच्छता करणे अतिशय सोपे असते.

### २) मल्टीपल इफेक्ट इव्हापोरेटर



उच्चप्रतीच्या स्टीमची बचत साधण्यासाठी ह्या तंत्राचा वापर करतात. त्यामुळे स्टीमची बचत होते व ऑपरेशन स्वस्तात होते. पेपर इंडस्ट्रीमध्ये बाष्पीभवन ह्याच तंत्राने करतात.


### ३) एक्स्ट्रॅक्टर




फिड आणि सॉलव्हन्टचा एकमेकांशी संबंध आणून एक्स्टॅक्ट व रॅफिनेट मिळविण्यासाठी ह्या तंत्राचा उपयोग होतो. द्रव मिश्रणांतून उपयोगी पदार्थ मिळविण्यासाठी ऑपरेशन करतात.


### घन द्रव संपर्क उपकरण

घन मिश्रणातून एक घटक द्रवांत मिसळून काढण्याच्या तंत्राला लीचींग असे म्हणतात.





### द्रव अथवा वायुचे वहन

### १) सेंट्रीफ्युगल पंप




वेगवेगळ्या प्रकारचे द्रव हाताळण्यासाठी वापरतात. याची रचना अत्यंत साधी असून त्याचे मेन्टेनन्स सोयीस्कर आहे.

### २) रेसिप्रोकेटींग पंप किंवा कॉम्प्रेसर



अतिशय जास्त दाबाचे द्रव मिळविण्यासाठी वापरण्यात येणारे साधन.


### ३) जेट इजेक्टर



कमी दाबाची हवा निर्माण करण्यासाठी किंवा उच्च प्रतीचा निर्वात निर्माण करण्यासाठी वापरण्यात येणारे साधन. अति दाबाच्या वाफेसाठी वापरात आणतात.


### घन पदार्थ आणि वायू यांचे परस्पर संबंध आणण्याचे साधन

#### १) फिक्स्ड बेड रिॲक्टर




कॅटेलेटिक रिॲक्टरमध्ये ह्या तत्त्वाचा उपयोग होतो. बेडची उंची कायम असते. ह्या प्रकारच्या रिॲक्टरमध्ये कॅटेलिस्ट पिलेट फार्ममध्ये असून त्याचे रिॲक्टरमध्ये येणाऱ्या वायुशी संबंध येतो.

#### २) फ्लुईडाईज्ड बेड



अतिशय सूक्ष्म स्वरूपात असणाऱ्या घनरूप कॅटेलिस्टचे वायुरूप रिॲक्टंटशी संबंध आणण्यासाठी ह्या तंत्राचा उपयोग करतात. उष्णतेचे नियमन अधिक चांगल्या प्रकारे होते.

मराठी ओघवती भाषा व विषय सोपा करून सांगण्याची हातोटी यामुळे हे पुस्तक वाचत नसून प्रत्यक्ष आपण ऐकत आहोत असे वाटते.

युनिट प्रोसेस या विषयाच्या बाबतीत विद्यार्थ्यांच्या असलेल्या अडचणी लक्षात घेऊन हे पुस्तक लिहिले गेले आहे हे जाणवते.

हे पुस्तक औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि निरनिराळ्या कारखान्यातील प्रशिक्षण केंद्रे यातील शिकाऊ उमेदवारांना मातृभाषेत असणारे हे पुस्तक उत्तम मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही.

पुस्तक आकर्षक मुखपृष्ठामुळे पुस्तक चटकन हातात घेऊन चाळावेसे वाटते.

पुस्तक वाचताना एक जाणवते की लेखकाने पुस्तकाच्या शेवटच्या पानावर स्वतःचा अल्पपरिचय मात्र द्यायला हवा.

पुस्तकाचे नाव

**युनिट ऑपरेशन्स आणि युनिट प्रोसेसेस्**

लेखक

**प्राचार्य एस्. एस्. मुजुमदार**

किंमत रुपये शंभर फक्त.

ISBN 81 - 85825-33-5

परिचय लेखन

**सौ. भारती जोशी**
ग्रंथपाल, वि. प्र. मं. चे
तंत्रनिकेतन, ठाणे - ४०० ६०१.

***

# परिसर वार्ता

'कविता' हा गंभीर वाङ्मय प्रकार आहे. प्राजक्ताच्या झाडावरून फूल ओघळावं तशी कविता मनात नकळत येत असते. मात्र तिला कवींनी स्वतंत्रपणे फुलू दिलं पाहिजे', असे विचार प्रसिद्ध कवी चंद्रशेखर गोखले यांनी मांडले. जोशी बेडेकर महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रशांत पाटील या विद्यार्थ्यांच्या 'पहाटवारा' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना कवी गोखले हे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. स. वा. गोखले हे होते. व्यासपीठावर प्रा. अनघा देशपांडे, प्रा. दामोदर मोरे इ. मान्यवर उपस्थित होते.



**पहाटवारा काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना चंद्रशेखर गोखले प्राचार्य स. वा. गोखले, कवी प्रशांत पाटील, प्रा. दामोदर मोरे आदी.**

'पहाटवारा' काव्यसंग्रहाविषयी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष, मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे म्हणाले की, 'विद्यार्थी जीवनातच आमच्या विद्यार्थ्यांचा हा काव्यसंग्रह प्रकाशित होतोय, त्याचा मला अभिमान वाटतो. 'पहाटवारा' मधील एक एक कविता ही मनाला स्पर्श करणारी कवीच्या स्वानुभूतीची झुळूक आहे.'

महाविद्यालयाचे प्राचार्य गोखले यांनी प्रशांत पाटील या विद्यार्थी कवीच्या काव्यानुभूतीचा आस्वाद घेत त्याचे अभिनंदन केले. याप्रसंगी कवी प्रशांत पाटील आणि त्याचे आईवडील सौ. सुहासिनी पाटील आणि अॅड. मोहन पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी चंद्रशेखर गोखले यांनी चारोळ्या सादर करून रसिकांची मने जिंकली. प्रा. अनिल भावड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कु. मिनाली गायकवाड या विद्यार्थीनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. गौरी तिरमारे यांनी आभार प्रदर्शन केले.

## मराठी लेखकांच्या हिंदी पुस्तकांचा अभ्यासात समावेश होण्याची गरज

महाराष्ट्रातील मराठी लेखकांच्या हिंदी पुस्तकांचा अभ्यासात समावेश करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. राजम नटराजन यांनी येथे केले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या हिंदी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'राष्ट्रीय स्तर पर हिंदी का महत्त्व' या विषयावर बोलतांना त्यांनी हे प्रतिपादन केले.

विनोबा भावे, श्री. कालेलकर, मामा वरेरकर यांसारख्या मराठी साहित्यिकांचे हिंदी साहित्य मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करावे असे सांगून त्यांनी हिंदी भाषेने संपूर्ण राष्ट्राला जोडण्याचा प्रयत्न केला आणि म्हणूनच हिंदीला राष्ट्रभाषा होण्याचा सन्मान मिळाला असे गौरवोद्गार काढले.

एखादा मराठी मुलगा हिंदी विषय घेत असेल तर तो उचित करतो. कारण तो एका चांगल्या परंपरेशी परिचित होत असतो आणि भविष्यात नोकरी आणि व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी हिंदी पूर्णपणे समर्थ आहे असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य स. वा. गोखले म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ५५ वर्षे पूर्ण होऊन सुद्धा राष्ट्रभाषेला किती महत्त्व आहे हे लोकांना सांगावे लागते हीच दुःखाची गोष्ट आहे. ते पुढे म्हणाले की, आमच्या महाविद्यालयाच्या बऱ्याच विद्यार्थ्यांनी हिंदी विषय घेऊन हिंदी भाषेविषयी आपले प्रेम व्यक्त केले आहे.

उपप्राचार्य श्री. बडगुजर त्याचप्रमाणे सर्व प्राध्यापक गण या कार्यक्रमास उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अनिल ढवळे यांनी केले तर राज किरण यांनी आभार मानले.

## शिक्षक दिन

५ सप्टेंबर रोजी झालेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष माननीय विजय बेडेकर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना अतिशय विचार परिप्लुत भाषण केले. कमीत कमी कायदे असल्यास तो समाज अधिक उन्नत असतो असे सांगून भारतीय समाज व सांस्कृतिक संचिताचे मोठेपण त्यांनी विशद केले. खेडोपाडी शाळा असल्याचे श्रेय ब्रिटीशांना देणे चुकीचे असून भारतात पूर्वापार खेड्यातून शिक्षण देणाऱ्या शाळा होत्या. 'आर्थिक निकष लागून प्रगती ठरविणे चुकीचे आहे. तर सांस्कृतिक निकषांवर प्रगतीचे मोजमाप व्हायला हवे' असे सांगून महात्मा गांधींच्या विधाना संदर्भात माहितीपूर्ण विवेचन त्यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. वीणा जोशी यांनी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. प्रास्ताविक संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी केले. बेडेकर विद्या मंदिरातील सौ. अंजली पटवर्धन सौ. विदुला वैद्य, सौ. केतकी अंबिये, पाध्ये, ए. के. जोशी विद्यालयातील सौ. डॉली, अशोक अहेरकर, सौ. मनीषा टीचर व सौ. सुनीता यांचा संस्थेतर्फे गौरव करण्यात आला. आनंदीबाई जोशी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी आपले विचार व्यक्त केले कै. श्रीपती सुमती टिळू पुरस्कार सौ. तेजस्विनी तेलंग यांना जाहीर करण्यात आला.

विद्या प्रसारक मंडळाचे व समारंभाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. समारंभास संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. मा.य. गोखले, श्री. मा. ना. पाटील, श्री. दिलीप जोशी, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य मुजुमदार, कला वाणिज्य महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. बडगुजर, विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्या मकरंद दीक्षित आदी मान्यवर उपस्थित होते.

## काव्यवाचन स्पर्धा

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात ६ सप्टेंबर रोजी झालेल्या काव्य वाचन स्पर्धेत अ व ब गटात ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. परीक्षक म्हणून सौ. सुनीता शेजवलकर (मराठी), प्रा. आठवले (हिंदी) व प्रा. सौ. लुईस (इंग्रजी) यांनी काम पाहिले.

### निकाल

**अ गट**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | गीतेश शिंदे |
| द्वितीय क्रमांक | शीतल कोर्डे |
| तृतीय (विभागून) | शुभांगी राजगुरू व तृप्ती भोईर |

**ब गट**

प्रथम क्रमांक अमित मिश्रा

द्वितीय क्रमांक सुयोग भिसे

तृतीय क्रमांक अवधेश यादव

याच दिवशी झालेल्या कथाकथन स्पर्धेत दोन्ही गटात मिळून ७ विद्यार्थी सहभागी झाले होते. हिंदीसाठी एकही स्पर्धक नव्हता. परीक्षक म्हणून प्रा. आठवले (इंग्रजी) व सौ. सुनीता शेजवलकर (मराठी) यांनी काम पाहिले.

**निकाल - अ गट**

प्रथम क्रमांक - गीतेश शिंदे

द्वितीय क्रमांक - विज्ञान पेडणेकर

तृतीय क्रमांक - दर्शना पाटील, दिग्विजय देसाई

**ब गट** - प्रथम क्रमांक - अनुप साहु

बांदोडकरमधील अवधेश यादव या विद्यार्थ्यास हुंडा विरोधी चळवळ या संस्थेचा बदलापूर येथे ठाणे जिल्ह्यासाठी घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक व प्रमाण पत्र मिळाले. अवधेशचे अभिनंदन !

**गीतेश शिंदे याला राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत पारितोषिक**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात 'प्रथम वर्ष विज्ञान' (पदवी) या वर्गात शिकणाऱ्या गीतेश शिंदे याला मुंबई नागरिक समितीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. पारितोषिक वितरण समारंभात कविवर्य नारायण सुर्वे यांच्या हस्ते गौरवपूर्वक सदर पारितोषिक गीतेशला देण्यात आले. गीतेशला ओम् नमः शिवाय प्रतिष्ठान या मुंबईच्या संस्थेतर्फे काव्य-लेखन स्पर्धेत उल्लेखनीय पुरस्कारही जाहीर झाला. सदर पारितोषिक त्याने मुंबईचे महापौर श्री. महादेव देवळे यांच्या हस्ते स्वीकारले.

**'रिव्हर क्रॉसिंग' - डॉ. मांजरमकर व विद्यार्थिनींचा वेगळा अनुभव**

ठाणे येथील मासुंदा तलावावर झालेल्या लेक क्रॉसिंगच्या प्रशिक्षण कार्यक्रमाला जोरदार प्रतिसाद मिळाला.

सर्वच वयोगटातील नागरिकांनी या उपक्रमात आवर्जून सहभाग घेतला होता. त्यात ७ वर्षांचा सोहम लेले होता अन् ७२ वर्षांचे अनंत कोळीही.

भ्रमंती या संस्थेने आयोजित केलेल्या या उपक्रमात सहभागी झालेल्यांनी दोरावरून साधारण २०० फुटांचे अंतर पार केले. गिर्यारोहक सुरेंद्र उर्फ नाना कोळी यांच्या हस्ते या उपक्रमाचे शनिवारी उद्‌घाटन झाले.

रिव्हर क्रॉसिंगचा थरार अनुभवलेली वैशाली कुरणकर ही विद्यार्थिनी म्हणाली की, या साहसाची सुरुवात करताना मनावर दडपण होते. पण इंचाइंचाने पुढे सरकू लागले आणि ते होत गेले. २०० फुटांचे अंतर पार केल्यावर तर मला अतिशय आनंद झाला.

योगिता कलस ही छात्रसेनेत सहभागी होणारी विद्यार्थिनी म्हणाली की, प्रथम खूपच तणाव जाणवत होता. मध्यभागी पोहचल्यावर खाली पाणी आणि वर आकाशच दिसत होते. पण यशस्वी करायचाच या जिद्दीने मी पुढे सरकत राहिले. हा थरारक अनुभव पुन्हा एकदा घ्यायला मला निश्चितच आवडेल.

बांदोडकर महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. विंदा मांजरमकर म्हणाल्या की, महाविद्यालयातील माझ्या विद्यार्थी जीवनापासून मी छात्रसेनेशी संबंधीत असल्याने

थरारक खेळांचा अनुभव मला आहेच. पण रिव्हर क्रॉसिंग करण्याची संधी आजच मिळाली. या अनुभवातून बरेच काही शिकायला मिळाले आहे.

### एस. आर. रंगनाथन - पुण्यतिथी निमित्त छोटा कार्यक्रम

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयातर्फे संयोजित करण्यात येणाऱ्या पदवी व निष्णात परीक्षेच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय ग्रंथालय व माजी विद्यार्थ्यांच्या ग्रंथालय सेवा समूहातर्फे डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या ३० व्या पुण्यतिथी निमित्त एक कार्यक्रम शनिवारी २८ सप्टेंबर संध्याकाळी आयोजित करण्यात आला होता.

वाडा महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अरविंद झांवरे यांच्या हस्ते ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. रंगनाथन यांच्या छायाचित्रास पुष्पहार घालण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनी केले. ग्रंथालय सेवा समूहाचे सदस्य निशा जाधव यांचे डॉ. रंगनाथन यांच्या कामाबाबत तर श्री संजय रुळे यांचे पाच सूत्रां संदर्भात भाषण झाले. प्रा. झांवरे यांनी अभ्यासाच्या दृष्टीने काही महत्त्वाचे विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अरुणा विचारे यांनी केले. समारंभास कला वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे उपस्थित होते.

कार्यक्रम संयोजित करण्यासाठी ग्रंथालय सेवा समूहाचे सदस्य श्री. सुनील पवार, श्री. संजय रुळे, श्री. एकनाथ पोवळे, श्री. आनंद लोहार, कु. पल्लवी तडस, कु. अरुणा विचारे, कु. दीपाली सुरते, कु. निशा जाधव, कु. वसुंधरा जगदाळे यांनी विशेष मेहनत घेतली.

### बांदोडकर महाविद्यालय- संख्याशास्त्र मंडळाचे चर्चासत्र

बांदोडकर महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र मंडळाने ८ सप्टेंबरला एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते. संख्याशास्त्राच्या इंडस्ट्रीजमध्ये ॲप्लिकेशन्स आणि या शास्त्रामध्ये असणाऱ्या संधी या विषयावर हे चर्चासत्र होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी संख्याशास्त्रप्रमुख डॉ. यशवंत साठे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील व संख्याशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक कार्यक्रमास उपस्थित होते. प्रारंभी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना महाविद्यालयाच्या संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक अशोक पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना अशाप्रकारचे सत्र खूपच मदत करते. शिवाय पालकांनीसुद्धा अशा कार्यक्रमाची मागणी केली होती. विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी लागावी म्हणून आमचे महाविद्यालय असे कार्यक्रम वेळोवेळी आयोजित करते.



मुंबई विद्यापीठाचे माजी संख्याशास्त्र प्रमुख डॉ. यशवंत साठे यांचे स्वागत करताना प्रा. अशोक पाटील

डॉ. साठे यांनी आपल्या विनोदी ढंगामध्ये संख्याशास्त्रातील गमती-जमती सांगितल्या. विद्यापीठाने अभ्यासक्रम जास्त व्यवसायाभिमुख करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थी आणि पालकांनी अशाप्रकारच्या चर्चासत्रात भाग घेऊन आपल्या पाल्याचे करियर प्लॅन करावे, असेही त्यांनी सांगितले.

एच. डी. एफ. सी, स्टॅण्डर्ड लाईफचे कन्सल्टंट प्रेम गुप्ता, आंतरराष्ट्रीय लोकसंख्या विज्ञान संस्थेतील डॉ. अभय देशपांडे, गॅलप एमबीए कंपनीतील सौ. सोनिया महाजनी, अॅव्हेन्टाईल या कंपनीच्या सौ. निकिता महाजनी इत्यादी तज्ज्ञ मंडळींनी आपापल्या क्षेत्रातील संधींची माहिती देऊन संख्याशास्त्राचा उपयोग कशाप्रकारे केला जातो याबद्दल मार्गदर्शन केले.

आयएमएस संस्थेतील नीलेश सरवटे यांनी एमबीएच्या कोर्सची उपयुक्तता आणि त्यामध्ये कोणती सत्रे आहेत याबद्दल वेगळ्या ढंगात आपले विचार मांडले. त्यांच्या भाषणाने सर्व श्रोते मंत्रमुग्ध झाले. खुल्या चर्चेमध्ये प्राध्यापक पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी फक्त पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता रोजचे प्रश्न सोडविण्यास ते ज्ञान कसे वापरता येईल, याचा विचार करावा. मुंबईतील के. सी., कीर्ती, मिठाबाई, भवन्स, रुईया, सोमय्या, पेंढारकर, झुनझुनवाला इत्यादी महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने या चर्चासत्राला उपयुक्त होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची दुसरी सभा संपन्न

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची दुसरी सभा महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव सभागृहात शनिवार दि. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी घेण्यात आली.

महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी समितीचे प्रमुख ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनी प्रास्ताविकात मागील सभेचा आढावा सादर केला. सभेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील आणि 'नॅक' समितीचे प्रमुख प्रा. आर. एस. पोद्दार यांनी माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सभेस आलेल्या विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांचा परस्पर परिचय झाल्यानंतर प्रा. मोहन पाठक यांनी अस्थायी समितीसाठी नावे देण्याचे आवाहन केले. या अस्थायी समितीचा पुढील कार्यक्रम ठरविण्याच्या दृष्टीने लवकरच बैठक होणार असून त्या बैठकीत पुढील कार्यक्रम जाहीर होतील. माजी विद्यार्थी संघास 'अनुबंध' असे नाव निश्चित करण्यात आले आले आहे.

सदर सभेस कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मकरंद दीक्षित, प्रा. बुरकुले, डॉ. नंदिनी पाटील. प्रा. स. ग. मेढेकर व अन्य प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर - पूर्व प्राथमिक विभाग आयोजित सण आणि उत्सव प्रदर्शन

आजच्या धकाधकीच्या जीवनात काही काळ विरंगुळा आणि दुरावला जाणारा नातेसंबंध दृढ होण्यासाठी सण साजरे करणे अत्यावश्यक आहे. सण हे आपल्या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत. या सणाबद्दलच्या तत्त्वाचा मागोवा घ्यायला हवा. मानवी मनामनात त्याद्वारे समाजात आणि त्यांच्या राष्ट्रात उत्साह, आनंद निर्माण करणे हा ह्या सण व उत्सव प्रकल्प करण्यामागचा मुख्य हेतू होय.

डॉ. बेडेकर विद्यामंदिर पूर्व प्राथमिक या शाळेने आपल्या विद्यालंकार सभागृहात 'सण आणि उत्सव प्रकल्प' या एका माहितीपूर्ण प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

या प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार दि. २७ सप्टेंबर रोजी वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य, शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, वि. प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष मा. य. गोखले, सेवानिवृत्त शिक्षक प्र. ग. वैद्य इ. मंडळी उपस्थित होती.

सभागृहात प्रवेश करताच समोरच सरस्वतीची मूर्ती, तेवत असलेली समयी, फुले, मूर्ती समोरील रांगोळी पाहून सहजतेने प्रत्येकाचे हात जोडले जात. त्यातच कानांवर पडणारे सुरेल व शांत अशा सनईच्या सूरांनी मन प्रफुल्लित होत होते. हरितालिका, गणपती, ऋषीपंचमी, गौरीपूजन, अनंत चतुर्दशी, नवरात्र, ललितापंचमी, दसरा, भाऊबीज, कार्तिकी एकादशी, गडावरील देवी, गोंधळ इत्यादी सणांची दृश्ये तयार करण्यात आली होती. अशी माहितीपूर्ण दृश्ये अतिशय कलात्मकतेने उभी केली होती. खोपडी उठवणे या एक सणासंबंधी विशेष माहिती नव्हती. खोपडी उठविणे हा ग्रामीण भागातील एक कुलाचार आहे. कार्तिकी एकादशीला सायंकाळी एका चौरंगावर बाळकृष्णाची मूर्ती ठेवतात. चौरंगाला उसाची पाच रोपे (कांडे) उभी बांधतात. व त्यांना सर्व बाजूंनी नवीन वस्त्र गुंडाळून खोपडी म्हणजे झोपडी तयार करतात. कृष्णाला प्रसाद म्हणून मूर्ती समोर आवळे, चिंचा, पोहे, भाज्या ठेवतात. हे दृश्य फार चांगल्या प्रकारे प्रदर्शनात दाखविले होते. समोर शेत असून शेतात रोपे दाखविली होती. आजूबाजूला गाय, बैल इ. जनावरे दाखवून ग्रामीण भागाचा आभास निर्माण केला होता.



लक्ष्मी पूजन



खोपडी उठवणे

हीं सर्व दृश्ये या शाळेतील शिक्षिकांनी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी, मुलांच्या व पालकांच्या सहकार्याने उभी केली होती. उत्साही शिक्षिकांची त्यांना मदत करणाऱ्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची, पालकांची व या सर्वांना अमोल मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापिकांचे अभिनंदन करावयास हवे.

**मॅथेमॅटिक्स क्लबचे उद्‌घाटन**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील मॅथेमॅटिक्स क्लब (गणित मंडळ) चे उद्‌घाटन दि. २१ सप्टेंबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात प्रसिद्ध गणिततज्ज्ञ व संगणकतज्ज्ञ डॉ. एम. ए. सांगलीकर यांच्या हस्ते समारंभपूर्वक झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील हे होते.

डॉ. सांगलीकर हे मिठीबाई महाविद्यालयात गणित विभागाचे प्रभारी प्रमुख, प्रा. पाठक व संगणक अभ्यासक्रमाचे संयोजक आहेत. विद्यापीठाच्या गणित अभ्यास मंडळाचे ते सदस्य आहेत. त्यांचा परिचय महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख व ज्येष्ठ प्रा. आर. एस. पोद्दार यांनी करून दिला.

गणिताचे व्यावहारिक उपयोजन या विषयावर बोलताना डॉ. सांगलीकर म्हणाले, या विषयाचे अर्थशास्त्र, पदार्थ विज्ञान, अभियांत्रिकी, वाणिज्य अशा अनेक ज्ञान शाखांत उपयोजन केले जाते. गणितीय उपाय कशात आहे याबद्दल बोलतांना ते म्हणाले, सोल्युशन हे व्याकरण आहे, पथदर्शक आहे, बदल आहे, धोरण आहे. अशा अनेक ठिकाणी गणितीय सोल्युशनचा वापर होतो.

कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम आयोजित करण्यासाठी गणिताचे विद्यार्थी व विभागातील सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.


प्रा. मोहन पाठक

## माजी विद्यार्थ्यांना आवाहन

महाविद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांना आवाहन आहे की त्यांनी माजी विद्यार्थी संघाचे सदस्य होण्याकरिता महाविद्यालयांशी संपर्क साधावा.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'अनुबंध' माजी विद्यार्थी संघाची सदस्य नोंदणी व पुढील कार्यक्रमांचा विचार चालू झालेला आहे. संपर्कासाठी दूरध्वनी - ५३३ ७६७२, ५३३ ६५०७

जोशी बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालयाचा 'सर्ज' माजी विद्यार्थी संघाचेही काम चालू झाले असून या संदर्भात उपप्राचार्य प्रा. बडगुजर सर, प्रा. दीक्षित मॅडम यांच्याशी संपर्क साधावा.



(पान क्र. ७ वरून)

## महर्षी व्यास

आपली मनोव्यथा व्यासानी कथन केली. त्यावर नारद म्हणाले- श्रीकृष्णाचे चरित्र भक्तिभावाचे वर्णन करणारा, वेगळाच ग्रंथ लिहा म्हणजे तुमच्या मनाची अशांती दूर होईल. व्यासानी भागवत ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ भक्तीचे महाकाव्य झाले. व्यासान शांती लाभली.

व्यास एक संदेश देतात- **न जातु कामात् न लोभात् । धर्म त्यजेत् जीवितस्यापि हेतोः । धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये । जीवो नित्यः हे तुरस्य त्वनित्यः ।** भीतीने, लोभाने, कामवासनेने धर्माचा कधीही त्याग करू नये. धर्म शाश्वत आहे सुख-दुःखे ही प्रासंगिक, जीव म्हणजे आत्मा नित्य जन्म मरण हे अनित्य समजावे.

व्यासांचे ऋण मान्य करून त्यांच्या स्मृतीसाठी वर्षातील एकदिवस राखून ठेविला आहे. तो म्हणजे व्यास पौर्णिमा होय. व्यासानी ज्ञानाचा दिवा अखंड तेवत ठेवला आहे. त्यांना कोटि कोटी प्रणाम. ''प्रज्वलितो ज्ञानमय प्रदीपः'' । नमः परमऋषिभ्यः ।

श्री. शं. बा. मठ
६, कुमार आशिष,
राममारुति रोड, ठाणे - ४०० ६०२.

***

(पान क्र. २३ वरून)

## भारतातील पाच आचार्य व त्यांचे तत्त्वज्ञान

त्यांच्या मुलाने म्हणजेच विठ्ठलनाथांनी पूर्ण केले. त्याला 'अणू-भाष्य' असे म्हणतात. भागवद् पुराणावरच्या भाष्याला 'सुबोधिनी' असे म्हणतात. त्यांच्या संप्रदायाला 'पुष्टी संप्रदाय' असे म्हणतात. त्यांचे जीवनकार्य १४७९ ते १५३२ पर्यंत चालू होते. त्यांचे तत्त्वज्ञान - ब्रह्मन हे सत्-चित्-आनंद आहे. माया ही ब्रह्मन पासूनच निर्माण होते. जीव व प्रकृति हे ब्रह्मनवर अवलंबून असतात. जीव हे भगवंताच्या पुष्टीवर म्हणजेच कृपेमुळेच मोक्ष प्राप्त करू शकतात. पुष्टी मार्ग व हाच भक्ती मार्ग आहे. त्यांनी 'श्रीकृष्णं शरणं मम' ह्या मंत्राचा घोष करण्यास सांगितला.

वरील ५ मुख्य आचार्यांचे जीवन व त्यांचे विचार यांची अगदी थोडक्यात माहिती दिली आहे. त्यांच्या मध्ये मूळ फरक काय होता व त्यांनी अजूनही बरेच विचार मांडले आहेत. ते सर्व अभ्यास करण्यासारखेच आहेत. ही फक्त भारतीय आचार्यांची ओळख करून दिली आहे.

डॉ. सौ. गीता कुलकर्णी
अ-३०६, मित्री अपार्टमेंटस्,
अंधेरी, मुंबई -४०००६९
दूरध्वनी : ८२४ १९००

***